दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२२१ | मंगळवार, दि.०३ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### संघ परिवाराची पसंती फडणविसांना!

महाराष्ट्रात महायुती सरकारला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी निकालानंतर सात दिवसांनंतरही सरकार स्थापण करता आलेले नाही. मंगळवारी भाजपच्या गटनेता निवडीसाठी आमदारांची बैठक होणार आहे. भाजपचे निरीक्षक राज्यात येऊन गटनेत्याची निवड करणार आहेत. ५ डिसेंबरला नव्या सरकारमधील मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल. या सोहळ्याला पंतप्रधान मोदींसह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### सत्ताधारी-विरोधकांमध्ये संविधानवरील चर्चेसाठी एकमत !

नवी दिल्लीः संसदेचे हिवाळी अधिवेशन सोमवार दि.२५ नोव्हेंबरपासून सुरू झाले आहे. मागील आठ दिवसांपासून संसद सभागृहात कोणतीही चर्चा झालेली नाही. विरोधकांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच अदानी प्रकरण, मणिपूर आणि संभलमधील हिंसाचाराच्या मुद्द्यावरुन गदारोळ घातला आहे. त्यामुळे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सोमवारी (दि.२) सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत उपस्थित सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी लोकसभेचे कामकाज सुरळीत पार पाडण्याचे मान्य करत संविधानवरील चर्चेसाठी एकमत दर्शवले आहे.

# शेतकऱ्यांचा दिल्ली चलो नारा

## राजधानीच्या सीमेवर धडकले शेतकरी; वाहनांच्या ५ किलोमीटरपर्यंत रांगा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**दिल्लीच्या सीमेवर शेतकऱ्यांनी नव्या कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळावी यासाठी आदोलन सुरू केले आहे. दिल्ली चलोच्या नाऱ्यानंतर पोलीसांनी दिल्लीच्या सीमेवर बॅरिकेड्स लावले. मात्र शेतकऱ्यांनी नोएडातील दलित प्रेरणा स्थळाजवळ बॅरिकेड्स तोडून दिल्लीत घुसण्याचा प्रयत्न केला. यामुळे नोएडातील युमना एक्सप्रेस वे बंद करण्यात आला. याठिकाणी ५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे दिसून आले.**



### शेतकऱ्यांना दिल्लीत प्रवेश नाही


शेतकऱ्यांनी त्यांच्या काही मागण्यांसाठी दिल्ली चलोचा नारा दिला आहे. तसेच शेतकरी संसदेला देखील घेराव घलणार असल्याची चर्चा सुरू आहे. सध्या संसदेचे अधिवेशन सुरू असल्याने या आंदोलनासाठी दिल्लीत प्रवेश देण्यात आलेला नाही, अशी माहिती पूर्व दिल्लीचे डीसीपी अपूर्व गुप्ता यांनी दिली आहे. दिल्ली-यूपीमध्ये सर्व लहान-मोठ्या ठिकाणी सुरक्षा दल तैनात करण्यात आल्याचीही माहिती त्यांनी दिली.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान भारतीय किसान परिषद, किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान मोर्चासह इतर संघटनांच्या नेतृत्वाखाली नोएडातील शेतकऱ्यांनी दिल्ली चलोचा नारा दिला आहे. शेतकऱ्यांनी नव्या कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळावी, या प्रमुख मागणीसाठी मोर्चा काढला असून चिल्ला सीमेवर महाजाम झाला आहे. दिल्लीत संसदेचे ◀◀ पान २ वर

### ९८ व्या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी शरद पवार

**पुणे । प्रतिनिधी**

**९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी शरद पवारांची निवड करण्यात आली आहे. आयोजकांच्या विनंतीवरुन शरद पवारांनी स्वागताध्यक्षपद स्विकारले आहे. फेब्रुवारी महिन्यात दिल्लीत हे साहित्य संमेलन पार पडणार आहे.**



२१ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान दिल्लीत ९८ वें अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. ७० वर्षांनी दिल्लीत होणाऱ्या या संमेलनाचे आयोजन सरहद संस्थेद्वारे केले जात आहे. शरद पवार यांनी औरंगाबाद (२००४), नाशिक (२००५), चिपळूण (२०१३) आणि सासवड (२०१४) इथे पार पडलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचें उद्घाटन केलेले आहे.

### भाजपने शिंदेंनाही फसवले-चव्हाण

पुणे: विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले, मात्र निकाल लागून दहा दिवस झाले तरी अजून मुख्यमंत्रिपदाबाबत सस्पेंस कायम आहे, तर दुसरीकडे काळजीवाहू एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे. सत्तास्थापनेला होत असलेला विलंब पाहता महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून महायुतीच्या नेत्यांवर टीका केली जात आहे. दरम्यान भाजपने उद्धव ठाकरेंना जसे फसवले तसेच एकनाथ शिंदेंनाही फसवल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे.

२०१९ मधील विधानसभा निवडणुकीत भाजपने उद्धव ठाकरे यांना फसवले, त्याच पद्धतीने एकनाथ शिंदे यांना फसविले आहे, असा मोठा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. निवडणुकीत पैशाचा वापर, सत्तेचा दुरुपयोग करून लोकशाही नष्ट केली आहे. सत्तेचा गैरवापर करून पोलिसांच्या गाड्यांमधून पैसे वाटण्यात आले. पण निवडणूक आयोग काही बोलला नाही, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, केंद्रीय निवडणूक आयोग स्वायत्त आहे, मात्र तरी जनतेच्या मनात शंका आहेत. सर्व मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या मोजणीला किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याला सरकारने का घाबरावे, असा सवालही त्यांनी केला. ◀◀ पान २ वर

# होय, मी जनतेच्या मनातला मुख्यमंत्री!

## कॉमन मॅन म्हणून जनतेची कामे केली, पण-एकनाथ शिंदे



**सातारा । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री कोण? या प्रश्नाचे उत्तर विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून ९ दिवस उलटल्यानंतरही राज्याच्या जनतेला मिळालेले नाही. मुख्यमंत्री कोण होणार हे अजुनही ठरलेले नसताना आपणच जनतेच्या मनातला मुख्यमंत्री असल्याचे विधान करुन काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठा संभ्रम निर्माण केला आहे. ठाण्याकडे निघण्यापुर्वी त्यांनी दरे या त्यांच्या मुळगावी पत्रकार परिषद घेऊन आपली भुमिका स्पष्ट केली.**

मुख्यमंत्रिपदावरुन सध्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री नाराज असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ वाढवून मिळण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याची चर्चा आहे. स्वत: शिंदेंनी आपण नाराज नसल्याचे ◀◀ पान २ वर

### भाजपकडून पर्यवेक्षकांच्या नावांची घोषणा

महाराष्ट्र विधानसभेत भाजपला मिळालेल्या यशानंतर महाराष्ट्रासाठी भाजपकडून पर्यवेक्षकांच्या नावांची घोषणा करण्यात आलेली आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांची महाराष्ट्रात पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह दोन्ही पर्यवेक्षक यांच्या उपस्थितीत दि. ४ डिसेंबर रोजी मुंबईत भाजप विधीमंडळ पक्ष नेतेपदी निवड करण्यासाठी बैठक होणार आहे.

### नेमकं काय म्हणाले एकनाथ शिंदे?

तुम्ही मुख्यमंत्री व्हावे अशी मागणी आहे. अनेकांकडून अशी मागणी होत आहे. याबद्दल काय ठरलं? असा प्रश्न शिंदेंनी ठाण्याला निघण्याआधी घेतलेल्या पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना शिंदेंनी, सहाजिक आहे, मी जनतेचा मुख्यमंत्री म्हणून काम केले, असे म्हटले आहे. पुढे बोलताना, मी म्हणायचो सीएम म्हणजे चीफ मिनिस्ट नाही तर कॉमन मॅन! कॉमन मॅन बनून मी कॉमन मॅनच्या अडचणी, दु:ख समजून घेऊन सोडवण्याचा करण्याचा प्रयत्न केला. सहाजिक आहे लोकांची भावना, असेही शिंदे म्हणाले. कोणताही संभ्रम नको म्हणून मी...

### गृहखातं पाहिजे का?

तुम्हाला गृहखातं पाहिजे का? असा थेट प्रश्न अन्य एका पत्रकाराने शिंदेंना विचारला. त्यावर उत्तर देताना शिंदेंनी, चर्चा होईल आणि त्यातून बऱ्याच गोष्टी निघतील. ज्यांनी आम्हाला निवडून दिले आहे त्या लोकांना आम्ही कमिटमेंट केली आहे. राज्याच्या विकासाच्या दृष्टीने लोकांबरोबरची आमची बांधिलकी जपायची आहे. महाराष्ट्रातील लोकांना काय मिळणार हे महत्त्वाचे आहे. मला काय मिळणार, तुला काय मिळणार यापेक्षा लोकांसाठी काय काम करायचे आहे ते महत्त्वाचे आहे, असे म्हटले आहे.

### गिरीष महाजन-शिंदे भेट



भाजपचे संकटमोचक गिरीष महाजन यांनी एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवास्थानी जावून त्यांची भेट घेतली. यावे भेटीत नेमकी काय चर्चा झाली हे समजू शकले नाही, मात्र सरकार स्थापन्याबाबत चर्चा झाल्याचे समजते.

### संजय राऊतांना वेगळीच शंका



एकनाथ शिंदे हे केवळ गृहमंत्री खात्याबाबत नाराज असल्याचे वाटत नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या जागी भाजप दुसरे कोणी तरी आणत असल्याची शक्यता वाटत असावी. म्हणून शिंदे बहुतेक वेळ लावत असल्याचे खा. संजय राऊत म्हणाले.

### ईव्हीएम विरोधात वंचित राज्यभर आंदोलन उभारणार

**पुणे । प्रतिनिधी**



**वंचित बहुजन आघाडीच्यावतीने राज्यभरात ईव्हीएमविरोधात जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्प्या टप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे.**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २००४ पासून ॲड. आंबेडकर यांच्या नेतृत्वात ईव्हीएम विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून ईव्हीएम वापरामधील मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित ◀◀ पान २ वर

## राजकारण असंतुष्ट आत्म्यांचा महासागर

### नितीन गडकरी स्पष्टच बोलले, इथे प्रत्येक माणूस...

**नागपुर । प्रतिनिधी**

**राजकारण असंतृष्ट आत्म्यांचा सागर आहे असे विधान ज्येष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. नितीन गडकरी म्हणाले की, राजकारणात प्रत्येक व्यक्ती उदास आहे. प्रत्येक व्यक्ती नेहमी ज्या पदावर आहोत त्यापेक्षा जास्त महत्त्वाकांक्षा ठेवतो. नितीन गडकरी नागपुरात ५० गोल्डन रूल ऑफ लाईफ या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात बोलत होते.**



गडकरी पुढे म्हणाले, आयुष्य हा तडजोडी, मजबुरी, अडथळे आणि विरोधाभासांचा खेळ आहे. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय किंवा कॉर्पोरेट जीवन असो, प्रत्येक ठिकाणी आव्हाने आणि समस्या आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी आपल्याला आर्ट ऑफ लिव्हिंग समजून घ्यावे लागेल, असे नितीन गडकरींनी सांगितले.

राजस्थानमधील आपल्या एका कार्यक्रमाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, मी राजस्थान विधिमंडळाच्या एका महोत्सव कार्यक्रमात गेलो होतो. तिथे बोलताना असेच बोलून गेलो होतो. राजकारण असंतुष्ट आत्म्यांचा महासागर आहे. येथे प्रत्येक माणूस दु:खी आहे. नगरसेवक दु:खी आहे की त्याला आमदारकीची संधी मिळाली नाही. आमदार याकरता दु:खी आहे की त्याला मंत्री होता आले नाही. जो मंत्री झाला तो याकरता दु:खी आहे की त्याला ◀◀ पान २ वर

### एसटी महामंळाची शिवशाही सुरूच राहणार!

**बंद होण्याच्या अफवावर मंडळाकडून पडदा**



**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अपघाताच्या घटना येत असल्याच्या पार्श्वभुमीवर राज्याभरात वेगाने धावणारी शिवशाही बस बंद होणार अशा चर्चा रंगल्या आहेत. याबाबत एसटी महामंडळाने खुलासा केला असून, सदर बसेस या बंद करण्याचा एसटी महामंडळाचा कोणताही विचार नाही, असे स्पष्टीकरण एसटी महामंडळाकडून देण्यात आले आहे. महामंडळाकडे सध्या ७९२ शिवशाही (वातानुकूलित) बसेस असून त्यामध्ये कोणताही तांत्रिक दोष नाही. ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ डिसेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ९.५० क्विंटल | २,०९० | २,८७१ | २,५५३ |
| ज्वारी/हायब्रिड :७८.५० क्विंटल | १,८०० | ३,००० | २,३५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : १३.०० क्विंटल | ६,४११ | ७,४०१ | ६,९०३ |
| बाजरी: १५.५० क्विंटल | २,७५० | ३,०९१ | २,९१७ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ५७८.५० क्विंटल | ३,७०० | ४,३०० | ४,१८७ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |

## परमेश्वर येवले -जे. पी. नड्डा यांची भेट; मराठवाड्यातील राजकीय परिस्थितीवर चर्चा

### ग्रेट भेट: इंदौर विमानतळावर धावती भेट; बीड जिल्ह्यातील परिस्थितीचाही घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर भाजपच्या नेत्यांशी अत्यंत जवळीक असलेले परमेश्वर नाना येवले यांची सोमवारी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची इंदौर विमानतळावर धावती भेट झाली. या भेटीदरम्यान येवले यांनी नड्डा यांच्याशी बीडसह मराठवाड्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा झाली. नड्डा यांनी यावेळी बीडसह मराठवाड्यातील काही राजकीय बाबी जाणून घेतल्या. याप्रसंगी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव हे सुध्दा उपस्थित होते.**

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले आहे. ५ डिसेंबरला नवे सरकार स्थापन होणार आहे. त्यामुळे सध्या भाजपच्या राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर हालचाली सुरु आहेत. परमेश्वर नाना येवले यांचा राज्यातील भाजपचे व इतर नेत्यांसह राष्ट्रीय पातळीवरील भाजपच्या नेत्यांमध्ये नेहमीच वावर असतो.

भाजपच्या बहुतेक दिग्गज नेत्यांशी त्यांची जवळीक आहे. सोमवारी इंदौर विमानतळावर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा हे आले असता त्याच वेळी परमेश्वर नाना येवले सुध्दा विमान प्रवासासाठी तेथे आले होते. यावेळी दोघांची विमानतळावर भेट झाली. येवले नाना यांनी श्री. नड्डा यांचा साईबाबांची मुर्ती देऊन सत्कार केला. यावेळी दोघांमध्ये काही वेळ चर्चा झाली. नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्याने नड्डा यांनी बीडसह मराठवाड्यातील राजकीय परिस्थिती जाणून घेतली. यावेळी काही मुद्द्यांवर दोघांमध्ये चर्चा झाली असून यावेळी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव हे सुध्दा उपस्थित होते.



अग्रलेख

# संघ परिवाराची पसंती फडणविसांना !

महाराष्ट्रात महायुती सरकारला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी निकालानंतर सात दिवसांनंतरही सरकार स्थापण करता आलेले नाही. मंगळवारी भाजपच्या गटनेता निवडीसाठी आमदारांची बैठक होणार आहे. भाजपचे निरीक्षक राज्यात येऊन गटनेत्याची निवड करणार आहेत. ५ डिसेंबरला नव्या सरकारमधील मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल. या सोहळ्याला पंतप्रधान मोदींसह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून एक आठवडा उलटल्यानंतरही महायुतीने सरकार स्थापनेचा दावा न केल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. महायुतीने राजभवनात जाऊन राजशिष्टाचाराप्रमाणे राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा करणे गरजेचे होते. पण भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुती सरकारच्या शपथविधीची तारीखच जाहीर करून टाकली. शिवसेना, राष्ट्रवादीला अंधारात ठेवून हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे महायुतीतही सारेकाही आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी महायुती सरकारच्या शपथविधीची घोषणा परस्पर 'एक्स'वरून करून टाकली. नवीन नेत्याने राज्यपालांकडे जाऊन सरकार स्थापनेचा दावा केलेला नाही. तसेच राज्यपालांनी आपल्या घटनात्मक अधिकाराचा वापर करून शपथविधीसाठी नेत्याला औपचारिकपणे निमंत्रित केले नाही. तरीही ठिकाण आणि वेळ कोणी ठरवली असे अनेक प्रश्न बावनकुळे यांच्या घोषणेनंतर उपस्थित झाले आहेत. दिल्लीत झालेल्या बैठकीनंतरही सरकार स्थापनेबाबत कोणतीही हालचाल झाली नाही. काळजीवाहू मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या डावपेचांबाबत सावधगिरी बाळगली आहे.

विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी २३० जागा जिंकणाऱ्या महायुतीचे घोडे मुख्यमंत्रिपदावरून अडले आहे. संघपरिवार व भाजपमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या नावावरून जोरदार संघर्ष सुरू असल्याचे बोलले जात आहे. फडणवीस यांच्यासाठी संघ परिवार हट्टाला पेटला आहे तर भाजपचे वरिष्ठ नेतृत्व ब्राह्मणेतर व्यक्तीसाठी (मराठा समाज) आग्रही असल्याची चर्चा आहे. त्यामुळे निकाल लागून आठवडा उलटला तरी मुख्यमंत्रिपदाचा तिढा सुटलेला नाही. अनेक मुद्यांवर भाजपचे नेतृत्व आणि रा. स्व. संघ यांच्यात मतभेद आहेत. भाजपला आता संघाची गरज नाही असे जाहीर वक्तव्य भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केले होते. आता राज्याच्या मुख्यमंत्री निवडीत होणारा विलंबही संघ-भाजपमधील मतभेदामुळे लांबल्याचे दिसून येत आहे. भाजपला १३२ जागा मिळाल्यानंतरही एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दावा केला. ही निवडणूक माझ्या नेतृत्वाखाली लढवली गेली. राज्यात लोकप्रिय ठरलेल्या लाडकी बहीण योजनेचा मी शिल्पकार असल्याने हे यश मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे. पण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपचाच मुख्यमंत्री होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर भाजपचे केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल असे शिंदे यांनी ठाणे येथील आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री बनण्याला भाजपमधील दोन वरिष्ठ नेत्यांचा आक्षेप आहे. यावर संघाचा सवाल असा की, फडणवीस हे ब्राह्मण आहेत, २०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री बनल्यानंतर त्यांनी पाच वर्षांची आपली कारकीर्द पूर्ण केली होती. तेव्हा ते ब्राह्मण होते हे भाजपच्या नेतृत्वाला माहीत नव्हते का? भाजपचे नेतृत्व 'ओव्हरस्मार्ट' आहे. फडणवीस यांची निवड न करता आपण मुलखावेगळी कामगिरी करत आहोत असा भाजप नेतृत्वाचा समज आहे. वास्तविक पाहता त्यांच्या विचारांना कोणताही तर्क नाही. फडणवीस यांची क्षमता भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे असे रा.स्व. संघाचे मत आहे. महायुती सरकारच्या रचनेबाबत अमित शहा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी गुरुवारी रात्री सुमारे तीन तास बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस हेच असतील हे स्पष्ट करण्यात आले. मात्र पुण्यातील खासदार मुरलीधर मोहोळ, आमदार चंद्रकांत पाटील हे सुद्धा मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असू शकतात अशीही चर्चा आहे. त्यामुळे भाजप धक्कातंत्राचा वापर करणार का याकडे साऱ्यांचे लक्ष आहे. मुख्यमंत्रिपद तसेच खातेवाटपाचा फॉर्म्युला निश्चित न झाल्याने 'बार्गेनिंग पॉवर' वाढविण्यासाठी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी निघून गेले होते. तेथे ते आजारी पडले होते म्हणे. आता ते परत आले आहेत मात्र स्पष्ट असे काहीच बोलत नाहीत. आम्हाला भाजपाचा निर्णय मान्य असेल एवढेच ते सांगतात मात्र त्यांच्या मागण्या आणि अपेक्षा काय आहेत हे ते सांगत नाहीत. आता ते कधी बोलणार आणि काय बोलणार याकडे लक्ष लागले आहे. दुसरीकडे त्यांच्या पक्षाचे नेते मात्र गृहखात्याची मागणी करताना दिसत आहेत, याबाबत भाजप मधील एकही नेता स्पष्टपणे बोलायला तयार नाही. त्यामुळे आता नेमके काय होते हे पहावे लागणार आहे.

# आ.सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन पक्षाने न्याय द्यावा

## सरपंच परिवंत गायकवाड यांची मागणी



**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी विधानसभा मतदार संघाचे तीन वेळा सलग आणि मध्यंतरी, धाराशिव- लातूर बीड स्थानिक प्राधिकारी मतदार संघातून विधानपरिषद सदस्य आणि २०२४ च्या विधान सभा निवडणूकीत विक्रमी म ताधिक्य मिळवत चौथ्या वेळी विधानसभा सदस्य असे एकूण पाच वेळेस आम दार झालेले विकासाभिमुख नेतृत्व आ. सुरेश धस यांनी जामगाव या गावचे सरपंच पदापासून आपल्या राजकीय प्रवासाचा श्री गणेशा केला. जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषदेचे दोन वर्षे उपाध्यक्ष, आष्टी तालुका दुध संघाचे चेअरमन, महानंद डेअरीचे संचालक, आमदार राज्यमंत्री, विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष, श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष या विविध पदांवर त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. आष्टी विधानसभा मतदार संघातील विकासाचा पाईक म्हणून ओळखले जाणारे आ. सुरेश धस यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक महत्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे. त्यांच्या सततच्या जनसंपर्क आणि सेवेमुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास झाला आहे. सुरेश धस यांनी आष्टी विधानसभा मतदार संघात सिंचन, बीज, दळणवळण, शिक्षण आणि औद्योगिक विकासावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, गावोगाचात बीज पुरवठा, राष्ट्रीय महामार्गाशी जोडणी आणि पाटोदा, शिरूर येथील विकासाच्या महत्वाच्या काम गिरीचे तसेच तीन ही तालुक्यातील अनेक देवस्थानांसाठी निधी आणून भाविक भक्तांची सोय केली आहे असे उदाहरणे आहेत. या विकास कामांमुळे मतदार संघातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.**

स्वर्गीय रामचंद्र धसदादा यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय कार्यात सक्रिय झालेले आ. सुरेश धस हे जातीय भेदभाव न करता सर्वजाती धर्मातील लोकांना एकत्र घेऊन चालणारे समावेशक नेतृत्व म्हणून ओळखले जाते. त्यामुळे ते चार वेळा आष्टी विधानसभा मतदार संघाचे आमदार झालेले असून सहा वर्षे बीड, लातुर धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातुन विधान परिषद सदस्य राहिलेले आहेत. त्यांची लोकप्रियता अफाट आहे. आता मतदार संघातील जनता त्यांना मंत्रीपद मिळावे अशी मागणी आ. सुरेश धस यांचे कट्टर समर्थक कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा क- हेवडगावचे सरपंच परिवंत गायकवाड यांनी केली आहे. आ. सुरेश धस हे लडबच्या नेतृत्व आहे. म तीसाठी आणि अठरा पगड जातीसाठी हा नेता कायम कोणत्याही परिस्थितीला न डगमगता कायम धाडसी निर्णय घेत आलेला आहे. बीड जिल्ह्यातल्या राजकारणात त्यांनी अनेकवेळा उलथापालथ केलेली आहे. जे आहे ते रोखठोक बोलण्याची आणि करण्याची धमक स्वर्गीय रामचंद्र धस दादाच्या वा कर्तुत्ववान आणि धाडशी मुलामध्ये आहे. आ. सुरेश धस हे मराठा समाजाचे रांगर्ड व धाडसी नेतृत्व आहे. ते छुपा डाव खेळत नाहीत आणि खेळूही देत नाही. तसाच प्रकार या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या बाचत होताना दिसला. तो डाव जनतेनी उधळून लावला. निवडणुकीत झालेला प्रकार विजयी समेत प्रश्न असो की पाणी प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला प्रश्न सुद्धा त्यांनी वेळोवेळी पोटतिडकेने सभागृहात मांडलेला आहे. विशेष म्हणजे कोरोनाच्या महामारीच्या काळात महाराष्ट्रात सर्वात जास्त कोविड सेंटर आ.धस यांनी चालविले आणि त्यातून हजारो लोकांना या महाभयंकर संकटातून वाचविले होते. आ. सुरेश धस यांची ग्रामीण भागातील जनतेशी अतिशय घट्ट अशी नाळ जुळली आहे हे कालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून सिद्ध होते. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रश्नांचा त्यांना अत्यंत बारकाईने अभ्यास आहे. हे आपण वेळोवेळी त्यांच्या सभागृहातील भाषणांमधून पाहिलेच आहे म्हणून भारतीय जनता पार्टीने आ.धस यांच्या अनुभवाचा योग्य तो सन्मान करून राज्य मंत्रिमंडळत त्यांना कॅबीनेट मंत्री म्हणुन स्थान द्यावे. या निवडीचा फायदा आष्टी विधानसभा मतदार संघासह संपूर्ण मराठवाडचासह आणि महाराष्ट्रालासुद्धा होईल. त्यामुळे भारतीय जनता पार्टीने जनसामान्यांच्या मताचा आदर करीत त्यांना मंत्री करावे आणि बीड जिल्ह्याच्या विकासासाठी काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी त्यांचे कट्टर समर्थक कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा क- हेवडगावचे सरपंच परिवंत गायकवाड यांनी केली आहे. त्यांनी बोलून दाखवला. अनेक लोकांना ते झोंबले मात्र ते लोक आ. सुरेश धस यांचे पारंपारिक विरोधक आहेत. वाचाळ बडबड करणाऱ्या विरोधकाला महत्व द्यायचं नसतं अशा बाचाळ बौरांना आ. सुरेश धस समर्थक उत्तर देताना दिसत आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीने दैदीप्यमान असे यश मिळविले आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातून माजी मंत्री सुरेश धस यांनी ८० हजारांच्या फरकाने मोठा विजय संपादन केला आहे. आ. सुरेश धस यांनी बापूर्वी तीन वेळा विधानसभेचे नेतृत्व आणि एक वेळा लातूर बीड धाराशिव या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघातून विधान परिषदेमध्येसुद्धा काम केले आहे. त्यांच्याजवळ आम दारकीच्या चार टर्मचा दांडगा अनुभव आहे. त्यांचा जनसंपर्क सुद्धा खूप मोठा आहे. आघाडी सरकारच्या काळात त्यांनी महसूल व पुनर्वसन सह अनेक खात्याचे राज्य मंत्रीपद सुद्धा भूषविले आहे. त्यांनी मंत्रिपदाच्या काळात अतिशय उत्तम असे काम केलेले आहे. याच दरम्यान उत्तराखंडमध्ये आलेली पूर परिस्थिती असो की मतदार संघात पडलेला दुष्काळ असो आ.धस यांनी आपल्या कौशल्याचा वापर करून ही परिस्थिती उत्तमपणे हाताळली होती.


## माजलगाव सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा रामराजे रांजवण-रिंकू बोकन



**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरातील हॉटेल व्यंकटेश येथे मराठवाडा सराफ सुवर्णकार फेडरेशनचे अध्यक्ष गणेश बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ रविवारी मीटिंगमध्ये माजलगाव सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या अध्यक्षपदी रामराजे रांजवण यांची सलग दुसऱ्यांदा सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली व बीड जिल्हा उपाध्यक्षपदी गजानन रिंकू बोकन यांची नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.**

यावेळी बोलतांना मराठवाडा सराफ सुवर्णकार फेडरेशनचे अध्यक्ष गणेश बेद्रे म्हणाले कि, संघटना मजबूत असेल तर आपल्या व्यापाऱ्यांचा फायदा होतो. मोरक्या मजबूत असेल तर त्याच्यासोबत लढणारे शिपाई पण त्याचप्रमाणे असले पाहिजेत. येणाऱ्या काळामध्ये आपल्या व्यापारामध्ये खूप बदल करावे लागणार आहेत सर्व व्यापारी बांधवांनी हळूहळू ते बदल करावे जसे की जीएसटी, हॉलमार्क यामध्ये येऊन व्यवसाय करावा व्यवसाय करताना घ्यावयाची काळजी, मोड घेते वेळेस ती योग्य माणसाकडून पावती असावी अजून बरेच काही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायण सातपुते हे तर प्रमुख पाहुणे म्हणून मंचक थोरात, लक्ष्मीकांत मानधने,सुरेश सोळंके, राजू दाभाडे,प्रकाश चव्हाण, सतीश काशीद उपस्थित होते. भागवत गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रस्ताविक सचिव गजानन बोकन यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश उगले, लखन देशमुख, निळकंठ महाजन, दिलीप साबळे,दत्ता येवले,विक्रम टाक, रफिक अत्तर, मनोज आणेराव, अशोक अंडील, सदाशिव उगले, संजय गायके, मूव्हीज अत्तार, गणेश मुंडकर, प्रवीण शहाणे, नागनाथ देशमुख, अशोक सरवदे, निशांत गरम,अंगद गोंडे, संजय जाधव ,शरण काटकर , पुरुषोत्तम जाधव , सचिन डहाळे मल्लिकार्जुन खुरपे स्वप्निल जाधव, अमित गायके गोविंद सातपुते, गणेश सोळंके, अशोक काकडे, चंद्रकांत देशमुख भागवत चव्हाण, सुदाम गिरगुणे, गजानन हिंगे वैजनाथ गायके, छत्रभुज देशमुख,रवी काशीद, पायघन, सुनील उदावंत, उदय नरवडे, अर्जुन सातपुते मनोज देवडकर, विठ्ठल भुतकर गोविंद नेमाने प्रशांत गायके विठ्ठल तायडे यांनी पुढाकार घेतला.



**झरे ता.आटपाडी जि.सांगली येथे आमदार गोपीचंद पडळकर यांची जत विधानसभेच्या आमदार पदी प्रचंड मतांनी विजयी झाल्याबद्दल माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे नेते माधव निर्मळ यांनी सत्कार केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या सोबत सरपंच शिवाजी काळे रंजीत रुपनर आदी.**

## माजी सभापती नारायणराव मुळे यांना मातृशोक

**माजलगाव । प्रतिनिधी**



उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नारायणराव मुळे यांच्या मातोश्री तुळसाबाई बाजीराव मुळे व ८६ वर्षे यांचे दिनांक २ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता दुःखद निधन झाले आहे आज दिनांक ३ डिसेंबर रोजी शृंगारवाडी येथे सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. तुळसाबाई बाजीराव मुळे ह्या अत्यंत मनमिळावू शांत संयमी आणि धार्मिक वृत्तीतीच्या होत्या यांचे वर्दपकाळाने दि २ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता निधन झाले . त्या प्रगतशील शेतकरी व उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभपती नारायण बाजीराव मुळे यांच्या आई व शिंगरवाडी चे सरपंच अँड. प्रमोद मुळे यांच्या आजी होत्या त्यांच्या पार्थ देहावर अंत्यसंस्कार आज दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता शृंगारवाडी येथे येते करण्यात येणार आहे.

## मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्याची मागणी, काँग्रेसची स्वाक्षरी मोहीम- यादव

**मुंबई । प्रतिनिधी**

**नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांवर शंका उपस्थित करत काँग्रेस पक्षाने निवडणुकीत पारदर्शकता आणण्यासाठी मतपत्रिकेच्या (बॅलेट पेपर) माध्यमातून निवडणुका घेण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशाने व प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने राज्यभर स्वाक्षरी अभियान सुरू केले आहे.**



निवडणुकीतील विसंगतीवर सवाल

विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदानाच्या आकडेवारीत गंभीर तफावत दिसून आली. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, ५८.२२% मतदान झाल्याचे संध्याकाळी ५ वाजता सांगितले गेले होते. मात्र, रात्रभरात हेच मतदान वाढून ६५.०२% झाले आणि दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी ते ६६.०५% पर्यंत पोहोचले. यामुळे तब्बल ७.८३% म्हणजेच सुमारे ७६ लाख मतांची वाढ झाली. ही आकडेवारी नागरिकांसाठी आणि काँग्रेससाठी गंभीर चिंता निर्माण करणारी ठरली आहे. अशा परिस्थितीत मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी काँग्रेसने मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्याचा आग्रह धरला आहे.

राष्ट्रीय अध्यक्षांची मागणी

२६ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी भविष्यातील सर्व निवडणुका मतपत्रिकेवर घेण्याची मागणी केली. त्यांच्या या मागणीला सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, आणि विविध संस्थांकडूनही पाठिंबा मिळत आहे.

मोहीम व उद्दिष्टे

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार, ५ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत राज्यभर स्वाक्षरी संकलन मोहीम राबवली जाईल. या मोहिमेचे उद्दिष्ट आहे ५ लाख स्वाक्षऱ्यांचे संकलन. या स्वाक्षऱ्या राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्य निवडणूक आयुक्त, आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना सादर करण्यात येणार आहेत.

महत्त्वाचे ठिकाणे:,सरकारी कार्यालये,महाविद्यालये,बस स्थानके,रेल्वे स्थानके,कृषी उत्पन्न बाजार समित्या,शासकीय आणि निमशासकीय संस्था

संपूर्ण राज्यभर जनजागृती

जिल्हा व तालुका स्तरावरील काँग्रेसचे पदाधिकारी, माजी खासदार, आमदार, आणि सामाजिक नेते या मोहिमेत सक्रिय सहभाग घेत आहेत. नागरीकांच्या सहभागातून मतपत्रिकेच्या मागणीला देशभर पाठिंबा मिळवणे हाच या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. काँग्रेसने सर्वसामान्य नागरीकांना, विविध संघटनांना, आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. प्रशासन संघटक नाना गावंडे यांनी पत्र निर्गमित केले आहे.

विज्ञान तंत्रज्ञान कौशल्य विभाग प्रदेश प्रमुख सुरेश यादव यांनी सांगितले की, ''लोकशाही प्रक्रिया सुरक्षित करण्यासाठी मतपत्रिकाच एकमेव पर्याय आहे. ही मोहीम आमच्या विभागाच्या माध्यमातून आम्ही यशस्वी करून लोकांपर्यंत संदेश पोहोचवला जाईल. काँग्रेस नेहमीच जनतेच्या हक्कांसाठी लढत राहील.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा दिल्ली

हिवाळी अधिवेशन सुरू असल्याने आंदोलक शेतकऱ्यांना दिल्लीत सोडता येणार नाही, असे पोलिसांचे म्हणणे आहे. यामुळे पोलिसांनी दिल्ली-एनसीआरमध्ये बॅरिकेड्स उभारत वाहतुक इतर मार्गांनी वळवली आहे. सुरक्षा व्यवस्थेतही वाढ केली आहे. पोलीस प्रशासनाने सीमेवर जवळजवळ ४ हजार पोलिस बंदोबस्तावर ठेवले आहेत. नोएडातील सर्वच रस्त्यांवर पोलिस उतरले असून, विविध ठिकाणी पोलिस आणि आंदोलक शेतकरी समोरा-समोर आले. शेतकरी दिल्लीकडे निघाले असून, कंटेनरवर चढून ते आंदोलन करत आहेत. पायी निघालेले शेतकरी दलित प्रेरणा स्थळावर थांबले आणि त्यांना महामाया पुलावरून पुढे जाण्याचा प्रयत्न केला यामुळे पूल ठप्प झाला. काही वेळातच नोएडामध्ये अनेक किलोमीटर लांबच्या लांब वाहणांच्या रांगा लागल्या. महत्त्वाच्या कामासाठी दिल्लीकडे जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

---------

### होय, मी जनतेच्या

सांगत भारतीय जनता पार्टीचे केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे सांगितले. मात्र त्यानंतरही सत्तेतील वाट्यावरुन नाट्य सुरुच आहे. अशातच अचानक साताऱ्यामधील आपल्या दरे या मूळगावी गेलेल्या मुख्यमंत्र्यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना आपणच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहोत, असे विधान केले आहे. होय मी जनतेच्या मनातला मुख्यमंत्री आहे. कॉमन मॅन म्हणून जनतेची कामे केली! पण कोणताही संभ्रम नको म्हणून मी पत्रकार परिषद घेऊन माझी भूमिका स्पष्ट करताना भाजपाचं केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे आधीच स्पष्ट केल्याचे शिंदेंनी म्हटले आहे.

---------

### भाजपने शिंदेंनाही

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ठराविक मतदान यंत्रांतील मतचिठ्ठ्यांची तपासणी झाली, तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही. कारण, ठराविक मतदान यंत्रांमधील डेटा नष्ट केला जाऊ शकतो, असे ते म्हणाले. लोकसभा निवडणकीत लोकांनी भाजपबद्दल नाराजी दाखवून दिली पण लगेच पुढील चार महिन्यात लोकांच्या मनात एवढा बदल होईल आणि भाजप महायुती सरकारबद्दल इतका विश्वास संपादन करणे अशक्य आणि अविश्वसनीय आहे, असेही चव्हाण म्हणाले.

------------

### एसटी महामंळाची

सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात एकूण ७९२ शिवशाही बस आहेत. त्यापैकी ५०० बस धावत असून उर्वरित ३९२ बस कार्यशाळेत विविध कारणांसाठी दाखल झाल्या आहेत. शिवशाही बस या वातानुकूलित असतात. मात्र आता त्याचे लालपरीत रुपांतर करण्यासाठी वातानुकूलित यंत्रणा काढण्यात येणार असल्याची चर्चा सुरु होती. शिवशाहीचे रूपांतर साध्या बसमध्ये केले जाणार असल्याचेही बोलले जात होते. मात्र, एसटी महामंडळाने याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. शिवशाही बसेसची सेवा अविरतपणे सुरु राहणार आहे. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे सांगण्यात आले आहे.

**२०१७ मध्ये शिवशाहीची बससेवा सुरूवात**

शिवशाही ही बस प्रथम १० जून २०१७ रोजी मुंबई-राजगिरी मार्गावर धावली होती. तत्कालीन परिवहनमंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांच्या संकल्पनेतून शिवशाही बस सुरू करण्यात आली होती. त्यानंतर राज्यभरात शिवशाही बसेस धाऊ लागल्या. निम्या दरात वातानुकूलित बसची सुविधा मिळत असल्याने महिला शिवशाही बसचा मोठ्या प्रमाणात वापर करताना दिसत आहेत.

**गोंदियामध्ये शिवशाही बसचा मोठा अपघात**

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात २९ नोव्हेंबर रोजी भंडारा डेपोच्या शिवशाही बसचा भीषण अपघात झाला होता. शिवशाहीच्या या अपघातात ११ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. या अपघात प्रकरणी एसटी महामंडळाच्या भंडारा विभागीय अधिकाऱ्यांनी चालकाला निलंबित केले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांमध्ये शिवशाही बसच्या अपघाताच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

---------------

### राजकारण असंतुष्ट

चांगले खाते मिळाले नाही. आणि त्यानंतर तो याकरता दुःखी आहे की तो मुख्यमंत्री झाला नाही. मुख्यमंत्री याकरता तणावात आहे की हायकमांड कधी ठेवेल आणि कधी काढेल हे माहीत नाही. समस्या हे फार मोठे आव्हान आहे. त्याला पार करुन पुढे जाणं हे आव्हान आहे असे नितीन गडकरी यांनी सांगितलं. केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले की, त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांना अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या आत्मचरित्रातील एक वाक्य आठवते, ज्यात म्हटले आहे की, माणूस पराभूत होतो तेव्हा तो संपत नाही. जेव्हा तो हार मानतो तेव्हा तो संपतो.

युद्धभूमीवर हारल्यावर कोणी संपत नाही. पण युद्धभमी सोडून जातो तेव्हा संपतो असे नितीन गडकरींनी अधोरेखित केले. सुखी जीवनासाठी चांगली मानवी मूल्यं आणि संस्कारांची गरज आहे असेही गडकरींनी सांगितले. तसेच जीवन जगण्याचे आणि यशस्वी होण्याचे सोनेरी नियम सांगतानाच त्यांनी व्यक्ती, पक्ष आणि पक्ष तत्त्वज्ञानाचे महत्त्वही अधोरेखित केले.

----------------------

### ईव्हीएम विरोधात वंचित

बहुजन आघाडीने घेतला आहे. वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते हे आपापल्या विभागात ही मोहीम राबविणार आहेत. सर्व मतदारांनी या मोहिमेत सहभागी होऊन ईव्हीएमला हद्दपार करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

------

## एड्स दिनानिमित्ताने आयोजित युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जालना :- महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा रुग्णालय जालना येथे जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. जालना येथील जिल्हा रुग्णालयात जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीचे उदघाट हिरवी झेंडी दाखवून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीस युवकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.




रॅलीची सुरवात जिल्हा रुग्णालय जालना येथून होऊन मार्ग सतकर कॉम्प्लेक्स, शनी मंदिर, गांधी चमन येथे समारोप करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांच्यासह डापकु, एआरटी, आयसीटीसी, सुरक्षा क्लिनिक इत्यादी विभागातील कर्मचारी वर्ग, तसेच अशासकीय संस्था यांच्यासह परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थींनी व कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थींनी तसेच राज्य राखीव पोलिस दलाच्या बँड पथकासह पोलिस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलिसांची उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ०३ डिसेंबर २०२४



# सतत दोन दिवसाच्या ढगाळ वातावरणामुळे रब्बीची पिके धोक्यात

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) परिसरातच नव्हे तर संपूर्ण केज तालुक्यात दोन दिवसाच्या ढगाळ वातावरणामुळे रब्बीची पिके धोक्यात आली आहेत त्यामुळे शेतकऱ्यावर संकट आले आहे.

शेतकरी म्हटले की सतत कधी आसमानी तर कधी सुल्तानी संकटे त्यांच्यासमोर उभे राहिलेले असतात. याच संकटाचा सामना शेतकरी मोठ्या हिमतीने करत असतो, पण सरकार दरबारी मात्र याच जगाच्या पोशिंद्याला दारात उभे केले जाते. ऐवढेच नव्हे तर त्याची म्हणने ऐकून घेतले जात नाही, त्याला न्याय तर मिळवून देण्यासाठी कोणीच समोर येत नाही.




केज तालुक्यातील शेतकरी खरीप पिकामध्ये सोयाबीन पिकाची मोठ्या प्रमाणात निवड करत असतात. परंतु जसे सोयाबीन काढणीला येताच सोयाबीन पिकाचा भाव मात्र गडगडला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना झालेला खर्चही निघू शकत नाही या अवस्थेत सध्या शेतकरी आहे. रब्बी पिके तरी काहीतरी शेतकऱ्यांच्या हाताला लागेल या आशेवर शेतकरी शेतात कष्ट करत असतो परंतु जसे रब्बी पिके आता हातात येथील या अवस्थेत आहेत. यामध्ये गहू, हरभरा, राजमा, ज्वारी ई. इत्यादी पिके जोमात डोलत असलेली पहावयास मिळत आहेत. परंतु दि. १ डिसेंबर आणि २ डिसेंबर रोजी सतत दोन दिवस झालेल्या हवामान बदलामुळे पुढील काही दिवसात या जोमात डोलणारी पिके मात्र आता रोगाच्या प्रादुभवाच्या विळख्यात अडकून जाणार जाऊन नष्ट होण्याच्या मार्गावर येथील अशी अवस्था होत होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा फवारणीसाठी खर्च करून हातात आलेली पिके पदरात पडतील का नाही अशी अवस्था होणार आहे. त्यामुळे सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## पावसाळी वातावरणाचा पिकांवर तसेच जन जिवनावर परिणाम

अंबाजोगाई : बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या फिंगल चक्रीवादळामुळे दक्षिण भारतात मुसळधार पाऊस सुरू झाला असून या वादळाच्या परिणामाने अंबाजोगाई शहर व परिसरात पावसाळी ढग घोंगावत असल्याने शेतकऱ्याची चिंता वाढली आहे. आठवड्याभरात हळूहळू भरविणारी थंडी सध्या थोड्या प्रमाणात कमी झाली असून काही भागात हलकासा पाऊस होण्याचा इशारा हवामान खात्याच्या वतीने दिला आहे. अंबाजोगाई शहर आणि परिसरात पावसाळी वातावरण तयार झाली आहे ढग मोठा पाऊस देणारी नसली तरी ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्याची धास्ती वाढली आहे. सध्या कांद्याला चांगला भाव असल्याने शेतकऱ्यांची काढणीसाठी गडबड सुरू आहेत शेत शिवारामध्ये कांदा उघड्यावर पडला आहे अशा प्रसंगी जर पाऊस आला तर कांद्याचे मोठे नुकसान होऊ शकते आणि शेतकरी अडचणीत सापडला जाऊ शकतो तूरही जोमात असून काही ठिकाणी कापणी देखील झाली आहे जर मोठा पाऊस झाला जर तुरीची प्रत घसरणार असून काही ठिकाणी त्याची उगवण होऊ शकते पावसात सापडलेली तू विक्रीसाठी बाजारात आली तर व्यापारी कवडी मोलदाराने खरेदी करतात अशी भीती शेतकऱ्यांना सजावत आहे तुरीवर कीड आणि शक्यता कृषी तज्ञ सांगतात ढगाळ हवामान हरभरा पिकासाठी मार्ग असून त्या ओळखीचा प्रभाव होऊन पिकाचे जाण्याची शक्यता आहे काही भागांमध्ये ज्वारी पोटरी तर काही ठिकाणी फुलण्यात येण्याच्या अवस्थेत आहे.

## दासोपंत संशोधन मंडळाने अध्यात्मिक ग्रंथसंपदा एकत्रित केली -डॉ.हनुमंत कऱ्हाड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सर्वज्ञ दासोपंतांच्या साहित्याचा प्रचार आणि प्रसार संशोधन मंडळाच्या माध्यमातून होत आहे हे मोठे समाज उथ्थानाचे कार्य असून मोठ्या प्रमाणातील ग्रंथसंपदा एकत्रित करण्याचे काम या मंडळाने केले असून ते अजूनही चालू आहे असे मत लातूर येथील एम. आय.टी.चे वरिष्ठ संचालक डॉ.हनुमंत कराड यांनी व्यक्त केले. ते दासोपंत संशोधन मंडळास भेट देऊन जुन्या छायाचित्र, हस्तलिखिताची पाहणी आणि विविध अध्यात्मिक माहिती श्रवण केली त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की,दासोपंत यांचे अध्यात्मिक कार्य सर्वज्ञ दासोपंत यांच्या नावे उभारलेल्या संशोधन मंडळाने त्यांचे साहित्य दुरपर्यंत पोहोचवले



प्रामुख्याने संत साहित्यातील मार्गदर्शक तत्वे या अनुषंगाने सर्वज्ञ दासोपंतांनी वैशिष्ट्यपूर्ण लिखाण केले आणि ते जगासमोर आणण्याची आज खरी गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले याप्रसंगी डॉ. वर्षा सांगळे म्हणाल्या की,अंबाजोगाई ही विविध संतांची भूमी असून अध्यात्माच्या जडणघडणीतून या शहराची प्रसिद्धी झाली दासोपंत संशोधन मंडळाचे कार्य आता सर्व दूरपर्यंत झेपावले आहे असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी मंडळाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष अरूण देशपांडे,संचालक पत्रकार राहुल देशपांडे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी अजित सांगळे, मुकूंद घाटे आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.

## चौसाळा नवीन बस स्थानकाच्या बांधकामामध्ये सुधारणा करण्याची मागणी

### नवीन सुलभ स्वच्छालयाची मागणी

चौसाळा । प्रतिनिधी

येथे नव्याने बस स्थानक बांधकाम परवानगी मिळाल्याने बांधकाम प्रक्रियेला सुरुवात झाली या नवीन इमारतीच्या आवारात असलेले स्वच्छालय हे खूप वर्षांपूर्वी चे आहे व त्या स्वच्छालयात कुठल्याही सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांची कुचंबणा होत आहे .प्रवाश्यांच्या संख्येनुसार खूप छोटे आहे सध्याचं या स्वच्छालयात टॉयलेट बाथरूम कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था नाही तसेच महिला साठी सुध्दा कुठल्याच सुविधा उपलब्ध करण्यात आल्या नाहीत या स्वच्छालया चे ड्रेनेजची सिस्टीम पूर्णपणे बंद झाली असल्याने




प्रवासी व येथील नागरिक व्यावसायिक याना या घाणीचा खूप त्रास होत आहे तरी सबंधित म रा मा.मंडळ च्या अधिकार्यांनी लक्ष देऊन सुधारित नव्याने आराखडा तयार करून नागरिकांच्या व प्रवाशांच्या सोयीनुसार बांधकाम करण्यात यावे अशी मागणी होत आहे की नव्याने होणार्या बांधकामात सुलभ स्वच्छालय सध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मोठ्या स्वरुपात टॉयलेट बाथरूम सहित करण्यात यावे तसेच सध्याच्या बसस्थानकावर २ गाड्या पार्किंग झाल्यास तिसरी गाडी बाहेरून जात असल्याने सध्याची बस स्थानकाची मोकळी जागा वापरत घ्यावी अशी मागणी प्रवाशी नागरिकांतून एका निवेदनाद्वारे केली असून सदर निवेदन. सबंधित परिवहन मंत्री तसेच मा.विभाग नियंत्रक यांना देण्यात आले आहे

# व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरचीची पुड टाकून लुटणारे आरोपी जेरबंद

परतुर । प्रतिनिधी

परतुर येथील व्यापारी प्रसाद क्रांतीलाल पोरवाल संध्याकाळी नऊ वाजेच्या सुमारास मलंगशहा चौक येथे असलेले त्यांचे किराणा दुकान बंद करून गल्ल्यातील रक्कम अंदाजे तीन लाख रुपये कापडी पिशवीत टाकून मोटर सायकल ला अडकावून घरी घेऊन जात असताना काही अज्ञात चोरट्याने त्यांचा पाठलाग करून रोडवर त्यांना अडवून त्यांचे डोळयात मिरची पावडर टाकून त्यांच्याकडील मोटर सायकलला अडकवलेली तीन लाख रुपये कॅश असलेली कापडी पिशवी जबरदस्तीने हिसकावून घेऊन गेले होते त्यावरून पोलीस ठाणे परतुर येथे जबरी चोरीचा



गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपास चक्रे परतूर पोलिस यांनी तत्काळ फिरउन

काल रात्री एक सवसइत

आरोपी अमीर उर्फ अमेर अमन जी कुरेशी राहणार लड्डा कॉलनी यास पकडून त्यास विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल करून त्याने त्याचे इतर २ साथीदार यांनी मिळून हा गुन्हा केला असल्याचे सांगितले आहे, सदर गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल क्रमांक एम एच २१ डीएक्स २९४२ ही गुन्ह्यात जप्त केली आहे, तसेच परतूर येथील ''सब के फायनान्स'' येथून चोरी केलेली एक पावरट्रेक कंपनीची इन्व्हर्टर बॅटरी जप्त करण्यात आलेली आहे. सदर आरोपी मध्ये असून विचारपूस चालू आहे, सदर आरोपीने परिसरातून अनेक चोरी केल्याचे उघकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, उपविभागीय पोलीस अधिकारी चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एम.टी.सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे ,पोका/ सतीश जाधव, पॉका/दीपक आडे, पोका/अच्युत चव्हाण, पोका / विजय जाधव यांनी केली आहे.

## ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक

जालना । प्रतिनिधी

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि.२ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता पार पडली. नागरिकांनी आपल्या ग्राहक हितासंबंधीत तक्रारी बैठकीत प्रत्यक्ष उपस्थित राहून लेखी स्वरुपात सादर केल्या. जिल्ह्यातील ग्राहकांच्या प्राप्त तक्रारीवर वेळेत कार्यवाही करण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी संबंधितांना यावेळी दिले. बैठकीस जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य सचिव तथा जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांच्यासह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद समितीवर नियुक्त शासकीय व अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती.

# कायदे विषयक, शासकीय सेवा व विविध योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन -जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्याचे निर्देशित केले आहे. त्यानुसार रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय आय.टी.आय. कॉलेज, घनसावंगी येथे विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महाशिबिराचे नियोजन करण्यासाठी आज दि. ०२



डिसेंबर, २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षेतखाली बैठक पार पडली.

बैठकीस जिल्हा न्यायाधीश-३ किशोर एम.जयस्वाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता पी. भारसाकडे-वाघ, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिपचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तुबाकले यांच्यासह विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ आणि जिल्हा न्यायाधीश-३ किशोर एम.जयस्वाल यांनी बैठकीमध्ये शासनाच्या सर्व विभाग प्रमुखांना महामेळावा यशस्वी करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना देवून योग्य नियोजन करण्याचे निर्देश दिले. या महामेळाव्यात सर्व शासकीय योजनांची तोंड ओळख, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती विविध स्टॉल्सच्या माध्यमातून लाभार्थ्यांना करुन देण्यात येणार आहे. या महामेळाव्यात विधी सेवा प्राधिकरण आणि विविध शासकीय विभागांचे स्टॉल एकाच छताखाली येणार असल्याने जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महामेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहुन योजनांचा लाभ घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे-वाघ यांनी केले आहे.

## आपला परिवार वृद्धआश्रम आजी-आजोबांना भोजनदान देवुन स्मृतीदिन साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

येथील पंचायत समितीचे माजी सभापती कालवश भिवाजी पौळ यांच्या चौथ्या चौथा स्मृतीदिना निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शुकलतिर्थ लिंबगाव येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.तर कळसंबर ता. बीड येथील आपला परिवार वृद्धआश्रम आजी-आजोबांना भोजनदान देवुन स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी विवेक भिवाजी पौळ,संजीवनी भिवाजी पौळ, सुजाता विवेक पौळ,माया मिलींद रणदिवे,प्रज्ञा संतोष साळवे,आनंद श्रीराम मोरे,वर्षाताई आनंद मोरे, यांच्यासह आदींची उपस्थीती होती.

यावेळी जिल्हा परिषद शाळा शुकलतिर्थ लिंबगाव या ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप विवेक पौळ भागवत वगरे,किसन वगरे,सरपंच कृष्णा थावरे,अमोल शेरकर,सिद्धार्थ पौळ,भास्कर कांबळे,अभिमान शेरकर, नारायण पांचाळ,प्रकाश खडुळ, मुख्याध्यापक शिंदे सर, कांबळे सर,रत्नपारखी सर,जावळे सर,कर्डीले मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

पान ६ वरून...

## कवी, लेखक देविदास

कुलपती डॉ. पी. डी. पाटील हे समारोप समारंभाचे अध्यक्ष होते. त्यांच्या हस्ते देविदास याला यशवंतराव चव्हाण स्मृती युवा गौरव पुरस्कार दिला गेला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी समरोहाच्या आयोजांबद्दला अभिनंदन करून देविदास याला.पाच लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्याची घोषणा केली. साहित्य, संगीत. शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रात ते सतत कार्य मग्न असतात. अत्यंत संयमी संवेदनशील, रसिक, श्रोते व संयोजक आहेत. देविदास याला ही मदत करून एक कर्तव्य पार पाडले आहे. यावेळी व्यासपीठावर विजय अण्णा बोराडे, बाबा भांड, पं. सतीश व्यास, सचिन ईटकर, दत्ता बाळ सराफ, समितीचे सचिव दगडू लोमटे उपस्थित होते. मराठवाड्यात सर्वदूर लेखक व वाचकांना या घोषणेची आनंदवार्ता प्रसिद्ध होताच डॉ. पी.डी. पाटील यांचे अभिनंदन होत आहे. देविदास सौदागर याला अत्यंत आर्थिक आधार देणारी घोषणा असल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे व समितीच्या पुरस्कार निवडी बद्दल आभार व्यक्त केले जात आहेत.

## सत्तर वर्षानंतर हसनाबादला मिळाला

अधिकारी नजीर खुरेशी सह आवरगाव गावचे सरपंच अमोल जगताप सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार, विजय शिनगारे ,शिवाजी मायकर, पोलीस स्टेशनचे परमेश्वर वखरे ,पत्रकार अतुल शिनगारे,सचिन थोरात तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये

खेळाडू रजत भोसले यांनी विद्यार्थ्यांनी दररोज एक तास तरी स्वतःच्या शरीरासाठी देण्याचे आवाहन केले . त्याचबरोबर कोणताही मैदानी खेळ खेळावा , त्यामुळे मन खंबीर होण्यास मदत होते.

या शालेय क्रीडा स्पर्धांच्या निरोप समारंभात प्रमुख पाहुण्या श्रीमती वर्षा दिख्खत ( जिल्हा सहसचिव खो-खो ) यांनी अगदी मोजक्या शब्दात मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी खेळांना महत्व द्यावे अशा सूचना केल्या. मोदी लर्निंग सेंटर येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी अनेक क्रीडा उपक्रम त्याचबरोबर सामाजिक , शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात नवनवीन ऊर्जा स्तोत्र निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे. आजपर्यंत या संस्थेच्या माध्यमातून अनेक क्रीडापटू, साहित्यिक, डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक तयार झाले आहेत. संपन्न झालेल्या शालेय क्रीडा स्पर्धेच्या सर्व यशस्वी स्पर्धकांचे संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक वसंत चव्हाण, डी.एच. थोरात , बी. आय. खडकभावी , प्रा सुरेश बिराजदार , शिक्षक पालक समितीच्या सदस्या श्रीमती डॉ. अर्चना थोरात , शाळेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन यांच्यासह प्राचार्य विनायक मुंजे व सर्व क्रीडा शिक्षक - सहशिक्षक यांनी विजेत्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## शिरूर पोलीस स्टेशनचे

जागेत स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून आता नवीन शासकीय इमारत तयार होईपर्यंत पोलीस स्टेशनचा कारभार बालाजीनगर मधील उपनगराध्यक्ष प्रकाश देसारडा यांच्या जागेतून हाकण्यात येणार आहे.पोलीस प्रशासनाच्या वतीने किरायाच्या जागेत सोमवारी सत्यनारायण पूजा करण्यात आली असून मंगळवार पासून नवीन जागेत कामकाजाला सुरुवात होणार आहे.या वेळी सहपोलीस निरीक्षक गणेश धोकरट यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी,देविदास खांडकुळे,पोलीस कर्मचारी अनिल तांदळे,बाळासाहेब सुरवसे,दिनकर माने,राज ससाणे,राहुल नांगरे,बापू सोनवणे,प्रतिष्ठीत व्यापारी किरण देसारडा,फय्याज शेख यांची उपस्थिती होती.

## आजच्या आरोग्य तपासणी

थोरात यांची भेट घेवून या शिबीराचे नियोजन करण्यात आले आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने महाराष्ट्रभर ३ डिसेंबरला दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात पत्रकार, संगणक चालक, यंत्रचालक, वृत्तपत्र विक्रेते आणि त्यांच्या कुटूंबीयांची आरोग्य तपासणी केली जाईल. या अनुषंगाने हे शिबीर बीड जिल्हा रुग्णालयात सकाळी ९ ते ३ दुपारी या वेळेत होणार असून या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक चिकीत्सक डॉ.अशोक थोरात यांना पत्र देण्यात आले. या शिबीरामध्ये रक्तदाब, मधुमेह, इसीजी, रक्तगट आदींसह पत्रकारांच्या कुटूंबीयांसाठी महिला आरोग्य अधिकार्यांच्या नियुक्त्या करण्यात येणार आहेत.या शिबीराचा बीड तालुक्यातील सर्व पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे, परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा परिषदे प्रमुख संजय हंगे ,जिल्हा उपाधयक्ष रवी उबाळे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यु घरत, संपादक राजेंद्र होळकर, हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, बीड तालुकाध्यक्ष दत्ता आजबे, कार्याध्यक्ष रेहान शेख, कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, सरचिटणीस प्रचंड सोळंके वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सुदाम चव्हाण आदींनी केले आहे.

## विद्यार्थ्यांनी विजेत्यांची

विविध क्रीडा स्पर्धा दरवर्षी होत असतात आणि या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांमध्ये राज्यस्तरीय पातळीवर गेले आहेत. यापुढेही विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये संधी देत राहू अशी ग्वाही दिली. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी अभ्यासासोबतच क्रीडा नैपुण्य अत्यंत आवश्यक आहे. कारण, शारीरिक आणि मानसिक संतुलन राखण्याचे काम विविध क्रीडा प्रकार करीत असतात. ज्ञानासोबतच शारीरिक आणि मानसिक तंदुरूस्ती आवश्यक आहे हे स्पष्ट करीत प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कुल अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांच्या क्रीडा आणि सांस्कृतिक कौशल्य विकासाबाबतीत सजग आहे. असे गौरवोद्गार त्यांनी काढले. केवळ जिंकण्यासाठीच नाही. तर जिंकलेल्या सर्वांसाठी आपण आनंद व्यक्त केला पाहिजे ही खिलाडूवृत्ती असली पाहिजे. जीवनामध्ये यश अपयश येत असते पण आहे. त्या परिस्थितीला स्वीकारून जिंकण्याची मानसिकता प्रत्येक विद्यार्थ्यांनी आत्मसात केली पाहिजे अशी अपेक्षा डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग नोंदवीत आपले क्रीडा नैपुण्य ही दाखवीले. पहिल्या दिवशी झालेल्या क्रीडा स्पर्धांचे बक्षिस वितरणही डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. या क्रीडा महोत्सवाचे आभार प्रदर्शन प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या सर्व शिक्षक, कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.

# एका बाजूला थंडीचा कडाका, दुसऱ्या बाजुला पावसाची हजेरी

## वातावरणातील बदलाचा शेती पिकांना फटका



राज्यात सध्या वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं थंडीचा कडाका जाणवत आहे, तर कुठं पावसाची हजेरी लागत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, या बदलत्या वातावरणामुळं राज्यातील शेतकरी मात्र, चिंतेत आहेत. या वातावरणातील बदलाचा शेती पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. आज परभणी शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात जोरदार पावसानं हजेरी लावली. या पावसामुळं रब्बी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जातेय. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार आज परभणी शहरासह जिल्ह्यातील काही भागात पावसाने हजेरी लावली. जवळपास १५ मिनिटांपासून हा पाऊस सुरु आहे. गेल्या दोन दिवसापासून शहरासह जिल्हाभरात होतं ढगाळ वातावरण होत आहे. आज ५ वाजण्याच्या सुमारास परभणी शहरासह काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसतोय. या पावसामुळं वातावरणात गारवा वाढण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे रब्बी पिकांचे नुकसान होण्याची भीतीही निर्माण झाली आहे. त्यामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत.भारतीय हवामान केंद्राच्या प्रादेशिक केंद्राने दिलेल्या अंदाजानुसार, तळ कोकण व मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना पुढील ३ दिवस हलक्या ते मध्यम सरींच्या पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात आलेल्या फेंगल चक्रीवादळाचा हा परिणाम असल्याचं सांगण्यात येत आहे. मंगळवार ३ डिसेंबरला तळकोकणातील सिंधूदुर्ग, कोल्हापूर जिल्ह्याला यलो अलर्ट देण्यात आला असून बुधवारी सिंधूदुर्ग, रत्नागिरी, सातारा, कोल्हापुरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सोलापूर, सांगली, तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर नांदेड जिल्ह्यातही हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचा पट्टा आता वायव्येकडे सरकत असल्यानं महाराष्ट्रात सध्या असणारी कडाक्याची थंडी ओसरणार असून तापमानाचा टक्का वाढणार आहे. वातावरण दमट व ढगाळ राहणार असून कोकण, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात हलक्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 'फेंगल' चक्रीवादळाने तमिळनाडूच्या किनारपट्टीला धडक दिल्यानंतर पुद्दुचेरी, कुड्डालोर आणि विल्लुपूरम्? यांच्या शेजारी भागात अल्प दाबाचे क्षेत्र निर्माण झाले. हे चक्रीवादळ हळूहळू पश्चिमेकडे सरकेल आणि नंतर त्याची तीव्रता न्यून होईल, अशी माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली होती.

# रब्बी टोमॅटो लागवडीसाठी रोपवाटिका व्यवस्थापन



खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात रोपवाटिकेत टोमॅटो पिकाचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी महत्वाची माहिती जाणून घेतल्यास चांगला फायदा होईल.

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर अ‍ॅझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादीवाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल. गादीवाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवे पर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदूरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०- १०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंची पर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.

# द्राक्ष बागेतील 'पिंक बेरी' समस्येवर प्रतिबंधात्मक उपाय



बागेतील किमान तापमान १० अंश सेल्सिअस पेक्षा कमी झाल्यास वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालीचे संतुलन बिघडते आणि मण्यातील हिरवे रंग गुलाबी रंगात बदलू शकते. यालाच गुलाबी मणी किंवा पिंक बेरी असेही म्हणतात. अशी प्रकारची द्राक्षे निर्यात करता येत नाही. या विकृतीसाठी कोणतेही रासायनिक उपाय अद्याप उपलब्ध नसल्याने यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे असते. जाणून घेऊ या पिंक बेरी टाळण्याचे उपाय.

द्राक्ष बागेतील पिंक बेरी प्रतिबंधक उपाय :मण्याचे पाणी उतरण्याच्या अवस्थे आधी द्राक्षाचे घड पेपरने झाकल्यास कमाल आणि किमान तापमानातील तफावत कमी राहण्यास मदत होते त्यामुळे गुलाबी मणी ही विकृती टाळता येते. मात्र घड पेपरने झाकण्यापूर्वी बागेत मिली बग किडी आणि भुरी रोग नियंत्रित असल्याची खात्री करावी. कारण एकदा पेपर झाकल्यानंतर फळ काढणीच्या ५ ते ६ दिवस आधीच काढला जातो, तोपर्यंत तो तसाच झाकून ठेवलेला असतो. त्यामुळे किडी आणि रोगाचे नियंत्रण झाले नाही तर द्राक्ष फळे या प्रादुर्भावामुळे खाण्यायोग्य राहणार नाहीत. द्राक्ष घडावर जैविक कीड नियंत्रकाची फवारणी करून घड झाकावे. पिंक बेरी टाळण्यासाठी बागेस रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे. बोदावर आच्छादन केल्यास मुळाच्या कक्षेतील तापमान वाढण्यास मदत होते. किमान तापमानात फारच कमी झाल्यास बागेत ठिकठिकाणी शेकोटी पेटवून धूर करावा, त्यामुळे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. शक्य असल्यास बागेभोवती पडदे लावावेत.

# श्रीलंकेकडून कांद्यावरील आयात शुल्कात कपात

## आता भारताला द्यावे लागणार फक्त १० टक्के निर्यात शुल्क



पुणे : श्रीलंकेने भारतीय कांदा आयातीवरील शुल्क २० टक्क्यांनी कमी केले आहेत. त्यामुळे आता भारतातील कांदा श्रीलंकेला निर्यातीसाठी १० टक्के निर्यात शुल्क द्यावे लागणार आहे. परिणामी देशातील कांदा उत्पादकांना या निर्णयाचा फायदा होईल, अशी चर्चा आहे. श्रीलंकेत कांद्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे भारतातून कांदा श्रीलंका आयात करणार आहे.

भारतातून कांदा आयात श्रीलंका करत असतो. पण श्रीलंकेने कांदा आयातीवर ३० टक्के शुल्क लावले होते. त्यामुळे भारतीय निर्यातदारांना कांदा निर्यात महाग पडत होती. परंतु आता मात्र श्रीलंकेतील कांदा संपण्याची स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी श्रीलंकेत कांद्याचे दर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यातून श्रीलंकेतील नागरिकांचा संताप वाढू शकतो, अशी शक्यता दिसू लागली आहे. त्यामुळे श्रीलंकेने कांदा आयातीवर फक्त १० टक्के शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला. त्याचा फायदा भारतीय निर्यातदारांना होईल, अशी शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत. भारतीय कांद्याची बांगलादेशसोबतच श्रीलंकेतही मोठ्या प्रमाणावर मागणी असते. त्यामुळे भारतीय कांद्याचा श्रीलंका दुसऱ्या क्रमांकाचा आयातदार देश आहे. परंतु केंद्र सरकारच्या आयात निर्यात धोरणाचा परिणाम दोन्ही देशातील व्यापारावर झाला आहे. भारतातून श्रीलंकेला खनिज इंधन, तेल, तृणधान्य, कापूस यासारख्या वस्तूंची निर्यात केली जाते. भारतीय वाणिज्य दूतवासाच्या आकडेवारीनुसार दोन्ही देशातील द्विपक्षीय व्यापारात ४८ टक्के वाढ झाली आहे.

# लिंबावरील खैऱ्या रोगाचे व्यवस्थापन



मागील काही दिवसांपासून लिंबाच्यामध्ये खैऱ्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगामुळे बागा खराब होऊन फळांची प्रत खालावत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे या रोगाचे वेळीच योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

रोगाची लक्षणे : लिंबाच्या झाडांच्या पाने, फांद्या व फळांवर ठळकपणे वर आलेले तांबूस चट्टे दिसतात. पानावरील चट्यांच्या सभोवताल पिवळसर वलय तयार होते. चट्टे जस जसे जुने होतात, तस तसे पिवळसर वलयाचे प्रमाण कमी होत जाते. चट्ट्यांचे प्रमाण पानाच्या बाहेरील भागांवर किंवा एका विशिष्ट भागात मर्यादित असतात. फळांवरील चट्टे फक्त बाहेरील सालीवर आढळतात व आतला भाग साबूत राहतो. खैऱ्याचे चट्टे असलेल्या फळांना बाजारात अत्यंत कमी भाव मिळतो.

रोगाचा प्रसार : खैऱ्या हा रोग झन्थोमोनास सिट्री या जीवाणूमुळे होतो. हा जीवाणू मुख्यतः पानं, डहाळ्या आणि झाडांच्या फांद्या यांच्यावर टिकून राहतो व वाऱ्यामुळे आणि पावसामुळे याचे प्रसारण होते. याशिवाय किडे, कापणीचे अवजार, दूषित कापणी यामुळे सुद्धा पसरतो. जून ते सप्टेंबर या काळात ढगाळ वातावरण आधिक असते. त्यामुळे या काळात खैऱ्या रोगाची तीव्रता अधिक असते.

रोग एकात्मिक व्यवस्थापन :लिंबू उत्पादकांनी वेळोवेळी काळजी घेऊन फवारणी केल्यास या रोगाचे वेळीच योग्य व्यवस्थापन करणे शक्य होते. खैऱ्या रोगाचे नियंत्रण एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीने सहज करता येते. त्यासाठी खैऱ्यामुक्त रोपवाटिकेतून रोपांची निवड करणे. झाडांना असलेल्या रोगयुक्त डहाळ्यांचा उन्हाळ्यात नाश करणे व बागेची नियमित छाटणी करणे. पावसाळ्याच्या सुरुवातीला कॉपर ऑक्सिक्लोराईड (३ ग्राम प्रति लिटर पाण्यात) किंवा बोर्डेक्स मिक्चर १ टक्का एक किलो ग्राम चुना प्रति १०० लिटर पाण्यात) आणि स्ट्रेप्टोसायक्लीन (१०० मिलिग्राम प्रति लिटर पाण्यात) ची ३ ते ४ वेळा प्रत्येक महिन्यात फवारणी करणे. कडूलिंबाच्या ढेपीचे मिश्रण १ किलो प्रति २० लिटर पाणी) यांची फवारणी करावी किंवा शिंपडणे. प्रत्येक झाडाची छाटणी केल्यावर अवजार (सिकेचर) २ टक्के सोडीयम हायपोक्लाराईड द्रावणाने निर्जंतूक करावे. छाटणी केल्यावर डहाळी/फांद्या लगेचच जाळून टाकाव्या. नवीन आलेल्या पालवीवर योग्यरित्या फवारणी करावी व फवारणी संपूर्ण झाडावर होत असल्याची खात्री करावी. पाने पोखरणाऱ्या अळीच्या (सीट्स लीफ माइनर) प्रादुर्भावाने खैऱ्या रोगाच्या संसर्गाला मदत होते. त्यामुळे नवतीवर कीटकनाशकाद्वारे पोखरणाऱ्या अळीचे वेळीच व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त इतर हंगामात व अवकाळी पावसाच्या अधूनमधून सरी आल्यास अतिरिक्त फवारणी करावी.




## जागतिक दिवस:
## कृषी शिक्षण दिन
## जागतिक अपंग दिन

### महत्वाच्या घटना

१७९६ : दुसरा बाजीराव मराठा साम्राज्याचा पेशवा बनला.
१८१८ : इलिनॉय अमेरिकेचे २१ वे रान्य बनले.
१८२९ : लॉर्ड विल्यम बेंटिंग यांनी सतीच्या प्रथेवर बंदी घातली.
१८७० : 'बॉम्बे म्युच्युअल लाईफ अ‍ॅश्युअरन्स सोसायटी' या भारतातील पहिल्या विमा कंपनीची स्थापना झाली.
१९१२ : ला तुर्की, बुल्गारिया, सर्बिया, ग्रीस आणि मॉन्टेगरो या देशांनी युद्धबंदीचा करार केला.
१९२७ : लॉरेल आणि हार्डी यांचा पहिला चित्रपट पुटिंग पॅट ऑन फिलिप्स प्रकाशित झाला.
१९६७ : डॉ. क्रिस्टियन बर्नार्ड यांनी दक्षिण अफ्रिकेतील केपटाऊन येथे जगातील पहिली मानवी हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी केली.
१९७१ : पाकिस्तानने भारतावर हल्ला केला.
१९७२ : मध्ये ओस्वाल्डो लोपेज अरेलानो यांनी रमोन क्रुज यांच्या जागी होंडुरास चे राष्ट्रपती बनले होते.
१९७९ : आयातुल्लाह खोमेनी ईराणचे सर्वेसर्वा बनले.
१९८४ : भोपाळ वायू दुर्घटना भोपाळमधील 'युनियन कार्बाईड' या कारखान्यातून मेथिल आयसोसायनेट या विषारी वायूची गळती होऊन सुमारे चौदाशे लोक लगेच मृत्युमुखी पडले तर नंतरच्या काही वर्षांत मृतांची एकूण संख्या सुमारे २०,००० इतकी झाली.
१९८९ : ला रशियाचे राष्ट्रपती खाईल गोर्वाच्योव आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी शीतयुद्ध संपल्याची घोषणा केली होती.
१९९४ : ताइवान मध्ये पहिल्यांदा स्वतांत्रिक निवडणूक पार पडली होती.
१९९४ : जपानमध्ये प्लेस्टेशन रिलीझ करण्यात आले.
२००० : ला ऑस्ट्रेलियाने लगातार १२ कसोटी सामने जिंकून एक नवा विक्रम नोंदविला होता.
२००८ : ला झालेल्या आतंकवादी हल्ल्यानंतर आजच्या दिवशी विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला होता.
२०१५ : सुगम्य भारत अभियान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७६ : हिज हायनेस राजराजेश्वर सवाई श्रीमंत यशवंतराव होळकर बहादूर (मृत्यू: २८ आक्टोबर १८११)
१८८२ : जगविख्यात चित्रकार नंदलाल बोस – श्री. बोस यांनी शांतिनिकेतनमधे सुमारे ३० वर्षाहून अधिक काळ अध्यापन करून अनेक चित्रकार तयार केले. (मृत्यू: १६ एप्रिल १९६६)
१८८४ : डॉ. राजेन्द्र प्रसाद – भारताचे पहिले राष्ट्रपती (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९६३)
१८८९ : खुदिराम बोस – क्रांतिकारक (मृत्यू: ११ ऑगस्ट १९०८)
१८९२ : माधव केशव काटदरे – निसर्गकवी (मृत्यू: ३ सप्टेंबर १९५८)
१९०३ : प्रसिद्ध लेखक यशपाल यांचा जन्म.
१९१३ : शिवनारायण श्रीवास्तव यांचा जन्म होता.
१९३७ : मैथिली लेखक विनोद बिहारी वर्मा यांचा जन्म.
१९८२ : भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कॅप्टन मिताली राज हिचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५२ : सेंट फ्रान्सिस झेविअर – ख्रिस्ती धर्मप्रसारक. यांनी भारत व जपानमधे हजारो लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. गोव्यातील 'ओल्ड चर्च'मधे यांचेच शव अजून जपून ठेवण्यात आले आहे. (जन्म: ७ एप्रिल १५०६ झेविअर, स्पेन)
१८८८ : ऑप्टिकल इन्स्ट्रुमेंट चे निर्माते कार्ल झैस यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८१६)
१८९४ : आर. एल. स्टीव्हनसन – इंग्लिश लेखक व कवी (जन्म: १३ नोव्हेंबर १८५०)
१९५१ : बहिणाबाई चौधरी – कवयित्री. त्या निरक्षर होत्या. तथापि त्यांच्यापाशी जिवंत काव्यरचनेची प्रतिभा होती. शेतीकाम आणि घरकाम करता करता त्या उत्स्फुर्तपणे ओव्या रचून गात असत. (जन्म: २४ ऑगस्ट १८८०)
१९५६ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार माणिक बंदोपाध्याय यांचे निधन. (जन्म: १९ मे १९०८)
१९७१ : मध्ये परमवीर चक्राने सम्मानित भारतीय सैनिक अल्बर्ट एक्का यांना वीरमरण.
१९७९ : मेजर ध्यानचंद – भारतीय हॉकीपटू (जन्म: २९ ऑगस्ट १९०५)
१९८० : ला पोतुर्गाल चे प्रधानमंत्री फ्रांसिस्को साकाल्नरो यांचे विमान दुर्घटनेत निधन.
१९८९ : भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचे निधन. (जन्म: २९ ऑगस्ट १९०५)
२०११ : देव आनंद – चित्रपट अभिनेता व निर्माता (जन्म: २६ सप्टेंबर १९२३).

# बीड शहरातील अनाधिकृत राजकीय बॅनरबाजी विरोधात निदर्शने





## शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाईची मागणी ;आंदोलनानंतर नगरपरिषद प्रशासनाला आली जाग ; तासाभरात बॅनर काढण्यास सुरुवात

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मुख्य चौक असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वर्दळीच्या ठिकाणी विविध पक्षांच्या नेत्यांच्या निवडी व शुभेच्छा देण्यासाठी लावण्यात आलेली होर्डिंग्ज छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पर्यायाने शहराचे विद्रुपीकरण करत असुन वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारे होर्डिंग्ज तातडीने काढुन घेण्यात यावेत तसेच न काढणारा विरोधात महाराष्ट्र मालमत्तेच्या निरूपणास प्रतिबंधक कायदा १९९५ मधील तरतुदीनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात यावी.तसेच कारवाईस जाणिवपूर्वक टाळाटाळ करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२ सोमवार रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने करण्यात आली. निवेदन नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुंबई नगरपरिषद प्रशासन संचनालयाला देण्यात आले. मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी संबंधित प्रकरणात अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांना नोटीस पाठवल्याचे सांगत नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी बॅनर काढण्यास सुरुवात केली आहे.परंतु कायमस्वरूपी ठोस कारवाई व्हावी त्यासाठी फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता आहे.यावेळी शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, मुस्ताक शेख,रामधन जमाले , अशोक येडे, राहुल नागरगोजे , बाळासाहेब शिंदे आदी सहभागी होते.

शहर व गावाचे विद्रुपीकरण थांबविण्यासाठी उच्च न्यायालयात अनेक संघटनांनी जनहित याचिका दाखल केल्या होत्या. जानेवारी २०१७ मध्ये जनहित याचिकेवर न्यायालयाने सर्व राजकीय पक्ष प्रमुखांना त्यांच्या पक्षातर्फे बेकायदा बॅनरबाजी करण्यात येणार नाही अशी हमी देण्याचे निर्देश देत राज्यातील सर्व नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद यांना त्याचे पालन करत वेळोवेळी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र त्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत नसल्याने बेकायदा होर्डिंग्ज, बॅनर, पोस्टर इत्यादी पाहायला मिळतात. सामाजिक कार्यकर्ते तसेच सामाजिक संघटनांच्या निवेदन आणि आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद प्रशासन आणि पोलीस प्रशासन मुग गिळून गप्पच आहे. बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज व पोस्टर लावणा-यांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या निरुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ अंतर्गत कारवाई कारवाई केली जाते.अनाधिकृत बॅनर लावणा-यांवर दंडात्मक कारवाईसह फौजदारी कारवाईची तरतूद आहे. नगरपालिकेच्या इस्टेट विभागामार्फत होर्डिंग्ज उभारणीचा परवाना दिला जातो.परवाना देण्याआधी संबंधितांकडून ज्या त्या पोलिस ठाण्याचा, अग्नि शामक दल विभागाचा आणि शहर वाहतूक नियंत्रण शाखेकडुन ना हरकत दाखला सादर करावा लागतो.या तिन्ही खात्यांकडुन एनओसी दाखला असेल तरच इस्टेट विभागाकडून होर्डिंग्ज उभारणीला परवानगी दिली जाते. मात्र बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज बाबत नगरपरिषद प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतली जात नाही.राजकीय दबावापोटी फौजदारी कारवाई करण्यात येत नाही आणि नगरपालिका प्रशासनाचा महसूल बुडत असुनही आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी नगरपरिषद प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांना सामाजिक कार्यकर्ते यांचे विनम्र आवाहन आहे की निदान संपूर्ण महाराष्ट्रात रेखीव आणि आकर्षक असणारा बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती राजकीय बॅनरबाजी करून चौकाचे विद्रुपीकरण करू नये.तसेच शहरातुन जाणारे दोन राष्ट्रीय महामार्गामुळे वर्दळीच्या ठिकाणी असणाऱ्या चौकात बॅनर लावल्याने वाहतुकीस अडथळा आणि अपघाताला निमंत्रण ठरत असुन निदान तेवढा चौक तरी बनरमुक्त राहु द्या असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

## सादोळा येथील अवैध वाळू उपसा तात्काळ थांबवा-प्रदीप सिरसट

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील सादोळा शिवारात असलेल्या गोदावरी नदी पात्रातील अवैधरित्या वाळू उपसा वाळूमाफियांचा सुरूच असल्याने ''पाणी मुरतंय तरी कुठे'' असा संतप्त सवाल सादोळा येथीलसामाजिक कार्यकर्ते प्रदीप सिरसाट यांनी उपस्थित केला आहे.



अनधिकृत वाळू उपसा रोखण्यासाठी जिल्हाभरात मोहीम राबविली जात असताना महसूल, पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांची पथके नेमली असताना अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरली आहे.

सादोळा शिवारातील नदी पात्रातील वाळू उपसा बंद करण्याचा प्रशासनाचा आदेश असला तरी गावाती बलाढ्य लोकांना हाताशी धरून रात्री चोरट्या पद्धतीने वाळू उपसा सुरूच आहे अनेक वेळा संबंधित विभागाकडून अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करण्याच्या मुस्क्या आवळण्याचा प्रयत्न केला मात्र तो अयशस्वी ठरला. अनेक दिवसापासून वाळू माफीया यांची नजर सादोळा शिवारातील गोदावरी नदी पात्रात पडली असून रोज शेकडो ब्रास वाळूचा उपसा केला जातो. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रार करून देखील कोणतीच कारवाई केली जात नाही. अर्थपूर्ण वरदहस्तांमुळेच अवैध वाळू उपसा होत असल्याचा गंभीर आरोप प्रदीप सिरसाट यांनी उपस्थित केला

## संविधान म्हणजे भारताच्या नैतिकतेचे रूप- प्रा.डॉ.अनंत राऊत

बीड । प्रतिनिधी

मानवाच्या दैनंदिन व्यवस्थेतील स्वाभिमानाने जगण्याचा सुमार्ग हा भारतीय संविधानाने ठरवून दिलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परिश्रम घेऊन भारतीय संविधानाची निर्मिती केली व राष्ट्राची एकता गठीत ठेवण्याचे बलशाली मूल्य दाखवून दिले. माणसाने माणसाशी नैतिकतेने वागण्यातच खरा धर्म आहे आणि तो जोपासला पाहिजे. केवळ कर्मकांड करणे म्हणजे धार्मिक असणे असे नव्हे तर इतरांचाही आदर आपल्या हून अधिक करणे म्हणजे खऱ्या अर्थाने नैतिकतेने वागणे असे आहे.विविध अंगाने शोषण विरहित व्यवस्था भारतीय संविधानाने बंधित केलेली आहे म्हणून संविधान म्हणजे भारताच्या नैतिकतेचे रूप आहे, असे मत प्रसिद्ध साहित्यिक तथा नांदेड येथील पीपल्स कॉलेजचे प्रोफेसर डॉ. अनंत राऊत यांनी व्यक्त केले.



देवगिरी प्रतिष्ठान संचलित,तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या भारतीय संविधान अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रमाप्रसंगी संविधानिक नैतिकता आणि वर्तमान वास्तव या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून ते आपले मनोगत व्यक्त करत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा. प्रा. प्रदीप रोडे (अध्यक्ष, नालंदा फाउंडेशन, बीड.), प्रमुख अतिथी- मा. डॉ. अरुण राऊत (माजी शल्यचिकित्सक), मा. उमा जगतकर (प्राचार्य, तुलसी इंग्लिश स्कूल), मा. डॉ.अशोक धुलधुले (प्राचार्य, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन) सह आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मा. राऊत म्हणाले की, भारतीय संविधानातील समानतेचा अधिकार हा अधिक महत्त्वाचा आहे. कारण यातूनच समानतेने नैतिकतेचे मूल्य मिळतात. आज रोजी कोण श्रेष्ठ कोण कनिष्ठ हे घराणे शाहीवर ठरव्या येत नसून व्यक्तिमत्त्वातील गुणवत्तेवरून त्याचे प्रमाण ठरवता येते. सर्व प्रकारचे भेदाभेद मनातून नष्ट करून एकोपा वाढवणे हे भारताच्या नैतिकतेचे कर्तव्य आहे. स्वबळावर स्वाभिमानाने जगण्याची सवय म्हणजे खऱ्या अर्थाने नैतिकता असून बुद्धी मार्ग स्वीकारणे खरा नैतिकतेचा मार्ग आहे. आमच्या सुदृढ जीवनाच्या मार्गांची मूल्य ही भारतीय संविधानात असून संविधानावर निष्ठा ठेवून त्याप्रमाणे वागणे हे खऱ्या भारतीयांचे कर्तव्य आहे, असे संबोधून नैतिक व अनैतिक तत्त्वांची फोड करून अनेक वर्तमानाचे वास्तववादी विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. धुलधुले यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे यांनी केले. यावेळी कार्यक्रमास बीड शहरातील संविधान प्रेमी बंधू-भगिनी, तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला कला महाविद्यालयात जागतिक एड्स दिन साजरा



बीड। प्रतिनिधी

येथील माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक एड्स दिन ०२ डिसेंबर २०२४ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर या होत्या तर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.बबन बोबडे यांची विचार मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.बबन बोबडे यांनी जागतिक एड्स दिन प्रसंगी हा दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी सांगितली व एडस ची लक्षणे उपाय याविषयी माहिती दिली. अध्यक्ष समारोप प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि ०१ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. एड्स हा एक गंभीर आजार आहे.या आजाराविषयी असलेले समज व गैरसमज सर्वासमोर विषद केले. एड्स ग्रस्त लोकांना वाळीत टाकणे चुकीचे असून त्यांना स्पर्श केल्याने, सोबत राहिल्याने, जवळून बोलल्याने एड्स होत नसल्याचे सांगून सर्वांनी आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी काळजी घेणे आवशयक असल्याचे सांगितले.तसेच यावर्षीची जागतिक एड्स दिनाची थीम.

'' हक्कांचा मार्ग घ्या: माझे आरोग्य माझा हक्क ''एचआयव्ही साथीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी मानवी हक्कांचे समर्थन करण्याच्या महत्त्वावर भर देते. याविषयी सविस्तर अशी माहिती शिक्षक तथा विधार्थिनीना सांगितली. तसेच दिनांक २ डिसेम्बर रोजी सकाळी ८ वाजता एडस दिनानिमित्त सार्वजनिक रॅली आयोजित करण्यात आली होती, त्यात महिला महाविदयालयच्या विधार्थिनींनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.बबन बोबडे ( रासेयो कार्यक्रमाधिकारी) यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनींनी उपस्थित होते.

## अंतकरणातील शुद्ध भावाने भगवंताला अंकित करता येते-कदम महाराज

**बीड । प्रतिनिधी**

**श्रीक्षेत्र कपिलधार येथे मासिक शिवरात्री व एकदिवशीय नाम यज्ञ सोहळ्याच्या निमित्ताने कदम महाराज यांची कीर्तन सेवा संपन्न झाली महाराजांनी कीर्तनासाठी संजीवन समाधीस्थ संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचा शुद्ध भाव ज्याचा देव अंकित तयाचा या अभंगावर सुंदर असे चिंतन मांडले महाराजांनी आपल्या चिंतनामध्ये सांगितले की भगवंत हा भक्तीचा भुकेला आहे जो भगवंताची भक्ती करतो देवाला अनन्यशिरन जातो देव त्याचा अंकित होतो नव्हे नव्हे त्याची सर्व जबाबदारी भगवान भोले शिव स्वतः घेतात असेही महाराजांनी सांगितले . कदम महाराजांनी मन्मथ स्वामी च्या लिखाणावर व त्यांच्या संपूर्ण चारितत्रावर प्रकाश टाकला.**



शुद्ध भाव ज्याचा देवअंकित तयाचा या अभंगावर खुप सखोल चिंतन मांडले भक्तीत वचन दिले तर न मोडणारे विश्वासाने सर्व निस्वार्थ करणारे हे संत आहेत . संतआपला संसार भक्तीसाठी संपवून टाकतात. आपन दाखवणारी भक्ती करुन संसार मोठा करतो म्हणून आपला शुद्ध भाव होत नाही, भोळा महादेव अंकिता होत नाही असे मन्मथ स्वामी च्या अंभगातुन संजीवन समाधी श्रीक्षेत्र कपीलधार येथे कदम महाराज सांगवीकर यांनी सांगितले या कार्यक्रमात शिव.भ.प विश्वनाथ स्वामी मुख्य पुजारी, डॉ.त्रिंबक स्वामी कपीलधार, शंकर स्वामी जायफळकर, शि.भ.प हनुमंत कोरे, शिव.भ.प.रमेश हीरे वाळके आबा तेरखेडा, गायक श्रीराम अंबेकर चाटा, मन्मथ लामतुरे, सिध्देलिग तळेकर, रामराव कोळगीरे, राडी सिध्देश्वर, वांगसकर मसला, गायक मंडळी भजनी मंडळ सांगवी न१सांगवी न२ भ.मं चाटा भ.मं मसला भ मं कानडी भ.मं तेरखेडा भ.मं अंबेजोगाई भ.मं रामवडगाव भ.मं धनेगाव भ.मं. शेकापुर भ.मं राडी भ.मं कोड भ.मं जायफळ होते हाजोराच्या संख्येने भाविक भक्त हजर होते. या एकदिवशीय सप्ताहाचे आयोजक शिवरात्री नियोजन कमेटी व पंचकमेटी मन्मथ स्वामी देवस्थान कपिलधार तसेच दर महिना मानसिक शिवरात्र कार्यक्रम राहील तरी सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा.


### जाहीरनामा
### जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत

**जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार वनवे दामोधर माणिकराव रा. चोपनवाडी ता. माजलगांव जि.बीड यांनी स्वतःच्या नावे वनवे दामोधर माणिकराव यांचा जन्म दिनांक ०८/०७/१९६७ रोजी चोपनवाडी ता. माजलगांव, जि.बीड येथे झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय चोपनवाडी ता. माजलगांव, जि. बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदार यांची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात, तसेच आपणांस कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास अर्जदारांचे स्वतःच्या जन्माबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याचे अनुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. २८/११/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

स्वाक्षरित
**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय माजलगांव**



### जाहीर प्रगटन
### मा. श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १६७८/२०२४**
**ॲड. कुंभार एस. आर.**
**सुदामती ज्ञानोबा नाईकवाडे वि. निरंक**

अर्जदार - १. सुदामती भ्र. ज्ञानोबा नाईकवाडे, वय-७० वर्षे, धंदा-निरंक, २. विलास पि. ज्ञानोबा नाईकवाडे, वय-५० वर्षे, धंदा-मजुरी, ३. कैलास पि. ज्ञानोबा नाईकवाडे, वय ४५ वर्षे, धंदा-मजुरी, रा. जेबा पिंपरी ता.जि.बीड, ४. प्रमिला भ्र. राजेंद्र जगताप, वय ४८ वर्षे, धंदा-घरकाम रा. खर्डा ता. जामखेड जि. अहमदनगर

गैरअर्जदार निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत ज्ञानोबा बळीराम नाईकवाडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत ज्ञानोबा बळीराम नाईकवाडे हे दिनांक १९/०९/२०२० रोजी सरकारी दवाखाना बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार नं. २ व ३ ही मयताची मुले आहेत. तसेच अर्जदार नं. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे ज्ञानोबा बळीराम नाईकवाडे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे ज्ञानोबा बळीराम नाईकवाडे, रा. जेबा पिंपरी ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०१/०१/२०२५.दिनांक १८/११/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

स्वाक्षरित
**क लिपीक**

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.



### जाहीर प्रगटन
### मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६६९/२०२४**
**(मार्फत विधिज्ञ श्री.व्ही. एस फाटक)**

अर्जदार :-१) कल्याण सिताराम कोटूळे,२) मधुकर सिताराम कोटुळे,३) लता नानासाहेब कोटुळे,४) आप्पासाहेब नानासाहेब कोटुळे,५) नारायण नानासाहेब कोटुळे वरील सर्व रा. वरवटी ता.जि.बीड, ६) हनुमान नानासाहेब कोटुळे, रा. वरवटी ता.जि. बीड ह.मु. आदर्शन नगर, पांगरी रोड, बीड ता.जि.बीड,७) अनिता रमेशराव मस्के, रा. बाहेगव्हाण ता. वडवणी जि.बीड,८) संगिता एकनाथ झाटे, रा. जिजाऊ नगर, कॅनॉल रोड बीड ता. जि.बीड,९) सुनिता अमोल शिंदे, रा. भाग्य नगर, बीड ता.जि.बीड,१०) स्मिता गोविंद शिंदे, रा. लऊळ नं. २ ता. माजलगांव जि.बीड,११) महानंदा शरद कोटुळे,१२) ओम शरद कोटुळे, १३) प्रशांत शरद कोटुळे,१४) सतीष शरद कोटुळे,१५) अशिष शरद कोटुळे,१६) शांताबाई रावसाहेब कोट्ळे सर्व रा. वरवटी ता.जि.बीड

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी नामे सिताराम पि. देवराव कोटुळे हे / या दि. ३०/०५/१९९० रोजी राहते घरी मोजे वरवटी, ता.जि.बीड येथे मयत असुन अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत अर्जदार क्र. ३ व ११ हया मयताच्या सुना आहेत. अर्जदार क्र. ४ ते ६ हे नातु आहेत अर्जदार के क्र. ते १० हया मयताच्या नाती आहेत अर्जदार क्र. १२ ही मयताची नातसुन आहे. अर्जदार क्र. १३ ते १६ हे मयताचे पणतु आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/११/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीखः- ०७/०१/२०२५.

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.


## विज्ञान उपकरण निर्मितीतून सृजनशीलता विकसित होते - नागनाथ शिंदे

माजलगाव। प्रतिनिधी

श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात आयोजित तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्धाटनप्रसंगी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, विज्ञान उपकरण निर्मितीतून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता विकसित होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो. विज्ञान प्रदर्शनाचे उद्धाटन दिपप्रज्वलन, माता सरस्वती व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, तर उदघाटक माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, तर व्यासपीठावर प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी, उपशिक्षणाधिकारी हजारे साहेब, उपशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक, गटशिक्षणाधिकारी माजलगाव रवींद्र महामुनी, गटशिक्षणाधिकारी केज लक्ष्मण बेडसकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी शाश्वत ज्ञान प्राप्त करण्यासाठी आतूर असले पाहिजे यासाठी अत्यंत प्रभावी उदाहरणे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. यानंतर गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक यांनीही प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण घेण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शाश्वत शिक्षण मिळावे यासाठी शासनाने अटलटिंकरिंग लॅब, कार्यान्वित करण्यात आली आहे. यातून विज्ञानाच्या विविध संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. प्रास्ताविक रवींद्र महामुनी (गटशिक्षणाधिकारी माजलगाव) यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार सदाशिव ढगे व सुत्रसंचलन श्रीमती सुरेखा गवळी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विभाग प्रमुख रवींद्र खोडवे यांनी सांगितला. या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता नववी ते बारावी व सहावी ते आठवी या गटातून तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग नोंदवला. यावेळी तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक विद्यार्थी उपकरणासह उपस्थित होते. तसेच संपूर्ण प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व विज्ञान विषय शिक्षक, प्रयोगशाळा परिचर, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीस उत्स्फूर्त प्रतिसाद

## न्यायमूर्ती सोनी, डॉ.अशोक थोरात, डॉ. उल्हास गंडाळ यांच्या हस्ते उद्घाटन




**बीड । प्रतिनिधी**

जागतिक एड्स दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनपर्यंत एड्स प्रतिबंधात्मक जनजागृती प्रभातफेरी आज काढण्यात आली. रॅलीस युवा वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

प्रभातफेरीचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव जी.जी.सोनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले.

प्रभातफेरीमध्ये महाविद्यालयीन युवक-युवती, रेड रिबन क्लब सदस्य, रोटरी क्लब अध्यक्ष, इन्नर व्हील क्लब, इन्फंट इंडिया, विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, विविध अशासकीय संस्थेचे कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते, सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांना एड्स मुक्त जीवन जगण्याची शपथ यावेळी देण्यात आली.अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.अशोक थोरात यांनी एचआयव्ही, एड्स जनजागृती रॅलीमधून दिलेली माहिती सर्व समाजातील घटकांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन केले. त्यानंतर उपस्थित शाळा, महाविद्यालयांना तसेच अशासकीय संस्थांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरुण राऊत, तत्वशील कांबळे, रोटरी क्लबचे अध्यक्ष नितीन गोपन यांनी युवक-युवतींना मार्गदर्शन केले. अशोक तांगडे यांनी गिताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी यांनी केले. श्रीमती राजश्री हिवरेकर यांनी सूत्रसंचालन केले. एफ.आर.फारोकी यांनी आभार मानले.

# सत्तर वर्षानंतर हसनाबादला मिळाला हक्काचा रस्ता, चार दिवसानंतर उपोषण सोडले



गावकऱ्यांची एकी व सामाजिक कार्यकर्ते यांचे आंदोलनास मिळाले पाठब ,गावकऱ्यांनी सजरा केला आनंद



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

हसनाबाद ता.धारूर येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर झालेला रस्ता एका शेतकऱ्याने अडकल्यामुळे पूर्ण गावास वेठीस धरले होते या रस्त्यासाठी गावकऱ्यांनी एकत्र येत मागील ४ दिवसा पासून आमरण उपोषन सुरू केले होते या आंदोलनास यश आले आहे.सामजिक कार्यकर्ते व आदोलकाच्या रेट्यामुळे काम सुरू झाल्यामुळे उपोषण सोडण्यात आले .हसनाबाद ला सत्तर वर्षानंतर पक्का रस्ता मिळाला असल्याने गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

तालुक्यातील हसनाबाद पासून ते राज्य मार्ग क्र. २३२ पर्यंत शासनाच्या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत डांबरी रस्ता मंजूर झालेला आहे व सदरील रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून हा रस्ता काही शेतकऱ्यांनी जाणून बुजून अडवल्यामुळे त्या हसनाबाद येथील नागरिक प्रशासनास निवेदन देऊन आज दिनांक २९ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालय धारूर या ठिकाणी उपोषणाला बसले होते सलग चार दिवस उपोषण सुरू होते उपोषण करते गावकरी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या सतत च्या पाठपुराव्यामुळे आंदोलनास यश आले प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्या नंतरच उपोषण मागे घेण्यात आले.यावेळी धारूर तहसीलचे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, मंडळ अधिकारी कपिल गोडसे, वरिष्ठ ◀◀ पान ३ वर

# आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते होणार जिल्हा कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेचे उद्घाटन



**पाटोदा । प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व जय हनुमान क्रीडा मंडळ महासांगवी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेचे आयोजन केलेले आहे .मंगळवार

दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी मौजे महासांगवी ता.पाटोदा येथे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या व जय हनुमान क्रीडा मंडळ च्या वतीने किशोर किशोरी कुमार कुमारी व पुरुष महिला गटाच्या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे .सदरील स्पर्धेचे उद्घाटन गेवराई विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार तथा बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा.श्री विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते दिनांक ३ डिसेंबर रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता होणार आहे. तरी सर्व क्रिडा मंडळांनी व खेळाडूनी सकाळी ठिक ९:३०वाजता किट मध्ये उपस्थित राहावे.सदरील कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास पाटोदा तालुक्यातील व पंचक्रोशीतील क्रिडा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आहवान जिल्हा कबड्डी असोसिएशन व जय हनुमान क्रिडा मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजस्थानी मल्टीस्टेट घोटाळा : चंदूलाल बियाणी अंबाजोगाई न्यायालयासमोर हजर



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वाढीव व्याजदाराचे आमिष दाखवून शेकडो ठेवीदारांच्या ठेवी हडप केल्याच्या गुन्ह्यात फरार असलेल्या चंदूलाल बियाणी यांनी आज सोमवारी (दि.०२) अंबाजोगाई न्यायालयासमोर शरणागती पत्करली.

ज्ञानराधा मल्टीस्टेट पाठोपाठ लागलीच राजस्थानी मल्टीस्टेटचा घोटाळा उघडकीस आला होता. ठेवीदारांना वाढीव व्याजदाराचे आमिष दाखवून जमा केलेल्या शेकडो कोटींच्या ठेवी परत करण्यास असमर्थ ठरलेल्या चंदूलाल बियाणीसह सर्व संचालक मंडळावर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले. त्यानंतर मागील अनेक महिन्यापासून चंदूलाल बियाणी फरार होता. अखेर सोमवारी त्याने स्वतः हून अंबाजोगाई न्यायालयासमोर शरणागती पत्करली.चंदुलाल मोहनलाल बियाणी यांना अंबाजोगाई जिल्हा कोर्टाने अटक करून अंबाजोगाई पोलीस शहर स्टेशन च्या स्वाधीन करण्यात आलेले आहे.



गेवराई - विधानसभा मतदारसंघाच्या नवनिर्वाचित आमदारपदी विजयसिंह पंडित यांची निवड झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा देताना उपअभियंता संजीव चोपडे, इंजी.मंगेश लोणकर, इंजी प्रकाश ढाकणे, अभिजित कवडे, गणेश कोल्हे, आकाश जगताप, अजय बागलाने, दिपक वाळके सह आदी

# कवी, लेखक देविदास सौदागर यांना डॉ. पी.डी. पाटील यांनी पाच लाखांचे केले आर्थिक सहाय्य



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे हे ४० वे वर्ष होते. या समारोहाच्या समारोप समारंभामध्ये तुळजापूर येथील तरुण लेखक देविदास सौदागर यांस यशवंतराव चव्हाण स्मृती युवा गौरव पुरस्कार देण्यात आला. ज्यांना ''उसवन'' या लघुकांदबरीसाठी साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळालेला आहे. तो आपला उदर निर्वाह टेलरिंग काम करून घर चालवतो. आजही त्याची आर्थिक परस्थिती तशी चांगली नाही. आई, वडील, पत्नी व मूलेबाळे असा परिवार आहे. पत्र्याच्या खोलीत तो शिवणकाम करतो. कर्णाच्या मनातलं व काळजात लेण्या कोरताना हे दोन कवितासंग्रह व एक लघु कादंबरी प्रकाशित आहे. या कादंबरीत शिंपी काम करणाऱ्या वर्ग ग्राहकांच्या रेडिमेड कपड्यामुळे वळल्यामुळे आर्थिक अडचणीत आला आहे याचे चित्रण या कादंबरीत आहे.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे ◀◀ पान ३ वर

# न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेची विविध स्पर्धानी सांगता



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षक प्रसारक मंडळ अंतर्गत न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये बाराव्या शालेय क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेत विविध प्रकारच्या स्पर्धा संपन्न झाल्या . या स्पर्धेत अनेक उदयोन्मुख यशस्वी क्रीडा स्पर्धक समोर आले आहेत. दोन दिवसीय शालेय क्रीडा स्पर्धांची सांगता शनिवार रोजी करण्यात आली . आज शाळेच्या मैदानावर सकाळपासून विविध क्रीडा स्पर्धा चारही हाऊसमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या. स्पर्धेदरम्यान स्पर्धेतील एकूण स्पर्धकामध्ये अत्यंत उत्साह पहायला मिळाला . या चार हाऊसपैकी ग्रीन हाऊस उपविजेता ठरला तर येलो हाऊस विजेता ठरला. तसेच एकूण शालेय क्रीडा स्पर्धेचा चॅम्पियन इयत्ता दहावीचा विद्यार्थी सय्यद हुजैफा हा ठरला . सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरीत करण्यात आले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात व्यासपीठावरून बोलताना प्रमूख पाहुणे , ◀◀ पान ३ वर

# शिरूर पोलीस स्टेशनचे स्थलांतर

## बालाजीनगर मधुन कामकाज होणार- कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी घेतला निर्णय



**मानूर । प्रतिनिधी**

शिरूर शहरातील पोलीस स्टेशन कार्यालयाचे स्थलांतर करण्यात आले असून बालाजी नगर येथून आता कारभार पार पडणार आहे.सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीदवाक्य घेवुन जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या जीवितास इमारतीमुळे होणारा संभाव्य धोका पाहता पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस स्टेशनचे स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला.पोलीस स्टेशनची इमारत आणि कर्मचारी वसाहत अत्यंत जीर्ण झाल्यामुळे कामकाज करत असताना कर्मचाऱ्यांच्या टेबलवर अनेक वेळा छताचे तुकडे कोसळले आहेत.तसेच सदरील इमारत कालबाह्य झाली असल्यामुळे तिचे जीवनमान संपलेले आहे.पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने अनेकवेळा इमारतीची डागडुजी देखील करण्यात आली होती.कर्मचारी मात्र जीव मुठीत धरून कामकाज करत असायचे.शेवटी इमारतीचे किरायाच्या ◀◀ पान ३ वर

# आजच्या आरोग्य तपासणी शिबिराला उपस्थित रहा

## चौरे ,साळुंके, डोळसे,घरत,नरनाळे हांगे, उबाळे,आजबे,चव्हाण यांचे आवाहन




**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदशनाखाली आणि बीड जिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने आज बीड जिल्हा रुग्णालयात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . या शिबिराला मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या शिबिरामध्ये पत्रकारांसह संगणक चालक, यंत्रचालक वृत्तपत्र विक्रेते यांच्याही आरोग्याचे तपासणी करण्यात येणार आहे आपल्या कुटुंबीयांसह या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे, जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे, बीड तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत,तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका निमंत्रक मंगेश नेटुरकर, वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सुदाम चव्हाण आदींनी केले आहे.

पत्रकारांचे आरोग्य शिबीर सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी दिली. या संदर्भात जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.अशोक ◀◀ पान ३ वर




# विद्यार्थ्यांनी विजेत्यांची मानसिकता आत्मसात करावी - डॉ.राजेश इंगोले

## प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी वार्षिक क्रीडा स्पर्धांना सुरूवात झाली. अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे अतिशय जोशपूर्ण वातावरणात उदघाटन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या प्राचार्या प्रा.गितांजली कुलकर्णी, प्रा.योगेश कुलकर्णी, सचिव शैलेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.गितांजली कुलकर्णी यांनी संस्थेच्या ◀◀ पान ३ वर



म्हसोबावाडी : येथील न्यु.सुप्रिम इंटरप्रायझेस अँड डेमोलिशनचे संचालक तथा गोव्हरमेट कॉन्ट्रॅक्टर आमचे परममित्र अक्षय भोसले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, फैसल शेख दिसत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# न्यायपालिकेत पुरोगामी राज्याला सुसंगत अशी भूमिका मध्यस्थींनी घ्यावी- सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती भूषण गवई

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संत, महापुरुषांची भूमी असून त्याला समाजसुधारकांचा वारसा लाभलेला आहे; न्यायपालिकेत पुरोगामी राज्याला सुसंगत अशी भूमिका मध्यस्थींनी घ्यावी, न्यायानंतर संबंधित व्यक्तींच्या चेहऱ्यावर आंनद व समाधानाची भावना दिसली पाहिजे, यादृष्टीने काम करावे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे (नालसा) कार्याध्यक्ष भुषण गवई यांनी केले.

पुणे येथे ३० नोव्हेंबर रोजी आयोजित एकदिवसीय विभागीय मध्यस्थी परिषदेच्या उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायलयाचे न्यायमुर्ती तथा महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाचे कार्याध्यक्ष अतुल चांदूरकर, मुंबई उच्च न्यायलयाचे न्यायमुर्ती रेवती मोहिते-ढेरे, रवींद्र घुगे, नितीन सांभरे, भारती डांगरे, अमित बोरकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई चे सदस्य सचिव समीर अडकर. तसेच चेतन भागवत, श्रीपाद देशपांडे, सागर इंगळे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील आदी उपस्थित होते.







सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती गवई म्हणाले, भारतीय राज्यघटनेत न्यायाचा हक्काला मुलभूत हक्क मानला आहे. देशात महाराष्ट्राची न्यायपालिका देशात अतिशय चांगली न्यायपालिका म्हणून ओळखली जाते, याचा आम्हाला अभिमान आहे. देशात विविध कायदे निर्माण करुन गावागावातील तंटे सर्वांनुमते मिटवून सकारात्क मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

मध्यस्थींनी दोन व्यक्ती, संस्थामधील मतभेद दूर करुन समान न्याय मिळेल यादृष्टीने प्रयत्य करावे. न्यायपालिकेत व्यक्तींना न्याय देतांना तो कमी वेळेत व कमी खर्चासोबतच चांगल्यारितीने न्याय देण्यावर भर दिला पाहिजे, हे उद्दिष्ट साध्य करण्यावर सकारात्म दृष्टीकोन अंगीकारत मध्यस्थीची महत्वाची भूमिका पार पाडावी. राज्यात मध्यस्थीची सुरू असलेली चळचळ यशस्वी करण्याकरीता प्रयत्न करावे. याकरीता अंगी इच्छा, तळमळ असावी लागते, असेही न्यायमुर्ती गवई म्हणाले.

श्री. वराळे म्हणाले, पुणे ही संताची भूमी असून या भूमीला संताची शिकवण लाभलेली आहे. समाजात विषमता दूर करुन समता प्रस्थापित करण्यासोबच वंचिताना न्याय देणे ही संताची शिकवणीप्रमाणेच आपल्या संविधानाचे तत्व आहे. यादृष्टीने समाजातील वंचिताना न्याय देण्यासोबतच विषमता दूर करण्याकरीता प्रयत्न करावे. नालसा उद्धघोष गीताच्या माध्यमातून 'न्याय सर्वांसाठी' ही संकल्पना सर्वत्र रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यातून विधीसेवेचा उद्देशही व्यक्त होत आहे, असेही श्री. वराळे म्हणाले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाचे (मालसा) मराठी भाषेतील उद्धघोष गीत, मध्यस्थी हस्तपुस्तिका तसेच विधी सेवा हस्तपुस्तिकेचे अनावरण करण्यात आले त्याच बरोबर राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या समाज माध्यमांचे ई-लोकार्पण करण्यात आले.

## मंचरमध्ये पत्रकारांसाठी आज आरोग्य शिबिर

मंच । प्रतिनिधी

''मंचर (ता. आंबेगाव) येथील उपजिल्हा रुग्णालयात पत्रकार आरोग्य दिनानिमित्त मंगळवारी (ता. ३) सकाळी आठ वाजता आंबेगाव तालुका पत्रकार संघ व पराग नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने पत्रकार व पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सर्व पत्रकारांनी शिबिराचा लाभ घ्यावा,'' असे आवाहन आंबेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील यांनी केले आहे.

''मराठी पत्रकार परिषद मुंबई ८६व्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी ३ डिसेंबर हा दिवस 'पत्रकार आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे, असे आंबेगाव तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नीलेश कान्नव यांनी सांगितले.

''शिबिरात विविध ४० प्रकारच्या तपासण्या केल्या जाणार आहेत. रक्त नमुने, अस्थी, हृदय, मधुमेह, कान, नाक, घसा, डोळे आदी तपासण्या, ईसीजी तसेच गरज असल्यास सिटी स्कॅन, एक्स-रे केले जातील,'' अशी माहिती मंचर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील कांबळे यांनी दिली.

## पुण्यातील कुरव्यात गँगकडून माझ्या जीवितास धोका; माजी आमदाराचा दावा, पोलीस संरक्षणाची मागणी

पुणे । प्रतिनिधी

माझ्या जीविताला धोका असून पोलीस संरक्षण मिळावे, अशी मागणी मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांनी केली आहे. पुण्यातील नामचीन टोळीकडून माझ्या जीवितास धोका असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे

याबाबत अधिक माहिती अशी की, मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांनी सोमवारी पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. यावेळी पुण्यातील नामचीन टोळीकडून माझ्या जीवितास धोका असल्याचा दावा त्यांनी केला आहे. रमेश कदम यांनी पोलीस अधीक्षकांना याबाबत सविस्तर माहिती दिली असून पोलीस संरक्षणाची मागणी त्यांनी केली आहे.

रमेश कदम यांनी म्हटले आहे की, माझ्या जीविताला धोका आहे. माझे अपहरण करून खंडणी किंवा जीवे मारण्यासाठी पुण्यातील नामचीन टोळीला सुपारी देण्यात आली आहे. याप्रकरणी काही दिवसांपूर्वी तीन आरोपींना अटक झाली असून मुख्य आरोपी आबा काशीद अद्यापही फरार आहे. आरोपी आबा



काशीद हा पुण्यातील नामचीन टोळीचा सदस्य असल्याने माझ्या जीवितास धोका आहे. त्यामळे जोपर्यंत या प्रकरणाचा तपास लागत नाही, तोपर्यंत मला पोलीस संरक्षण द्यावे, अशी त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, रमेश कदम यांच्याकडून खंडणी घेणे किंवा त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे अपहरण करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात तीन जणांविरोधात विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी मोहोळ पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

रमेश कदम हे मोहोळ विधानसभा मतदारसंघात २०१४ साली राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आले होते. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळात आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी रमेश कदम यांना अटक झाली होती. २०१९ साली त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या काळात तुरुंगात असताना अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून मोहोळ विधानसभेची निवडणूक लढवली होती. २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी महायुतीला पाठिंबा दिला.

# पुणेकरांचा श्वास विषारी !

## शहराच्या हवेची गुणवत्ता खराब गटात

पुणे । प्रतिनिधी

रविवारी शहराच्या हवेची गुणवत्ता खराब गटात गणली गेली. दिवसभर वाहतुकीची वर्दळ वाढली होती. त्यात ढगाळ वातावरण तयार झाल्याने शहरातील भूमकर चौक, विद्यापीठ चौक, वाकड या भागांतील हवा सर्वाधिक प्रदूषित होती.

शहराची हवा दिवसेंदिवस खराब गटात जात आहे. रविवारी शहराच्या सर्वंच भागात वाहनांची गर्दी वाढल्याने हवेची गुणवत्ता खराब गटात गेली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर पुण्याचे आकाश तांबड्या अन् पिवळ्या रंगांत दिसत होते. याचा अर्थ शहराची हवा प्रदूषित होत आहे, असा होतो. तांबड्या रंगात धायरी जवळील भूमकर चौक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक, पिंपरी-चिंचवड, वाकड, निगडी, चाकण, मोशी, खडकी हे भाग होते. तांबडा रंग म्हणजे हवा खराब गटात आहे. तर शहरातील कात्रज, शिवाजीनगर, कर्वे रस्ता, पाषाण, स्वारगेट, लोहगाव, आळंदी रस्ता, बाणेर हे भाग पिवळ्या रंगात दाखवले होते. याचा अर्थ




येथील हवा मध्यम गटात म्हणजे आजारी लोकांसाठी खराब असल्याचा अलर्ट दिला होता.

शहराच्या किमान तापमानात ३ ते ४ अंशांनी वाढ झाल्याने रविवारपासून गारठा किंचित कमी झाला. मात्र, बोचरे वारे अजून दोन दिवस मुक्कामी राहणार असल्याने रात्री अन् पहाटेचा गारवा कायम राहील. बुधवारपासून मात्र शहरातील थंडी पूर्ण कमी होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. २५ नोव्हेंबरपासून शहरात किमान तापमानात सातत्याने घट होताना दिसत होती. यंदाच्या हंगामातील सर्वांत कमी तापमान २९ नोव्हेंबर रोजी ९.२ अंश इतकी झाली, तर शनिवारपर्यंत शहराचे किमान तापमान ९.८ अंशांवर होते. मात्र, रविवारी शिवाजीनगरच्या तापमानात ४ अंशांनी वाढ होऊन ते १३.४ अंशांवर गेले, तर एनडीएचा पारा शनिवारी ८.२ अंशांवर होता. तो रविवारी १२.२ अंशांवर गेला. शहरातील कमाल व किमान तापमानात मोठी घट झाली होती. किमान तापमानात वाढ होत आहे. मात्र, कमाल तापमान अजूनही सरासरी २७ ते २८ अंशांवर आहे. यातही दोन दिवसांत हळुवार वाढ होऊन थंडी गायब होणार आहे.

## बसचालकाचा विजेच्या धक्क्याने शाळेच्या आवारात मृत्यू ; दुर्घटनेप्रकरणी गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

विद्यार्थी वाहतूक करणार्या बसचालकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना कोंढव्यातील सिंहगड सिटी स्कूलच्या आवारात घडली. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी संस्थेच्या संचालकांसह कर्मचार्यांविरुद्ध कोंढवा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला.



संतोष पांडुरंग माळवदकर (वय ४७, रा. पिसोळी ग्रामपंचायतीसमोर, कोंढवा) असे मृत्युमुखी पडलेल्या बसचालकाचे नाव आहे. सिंहगड सिटी स्कूलचे संचालक धनंजय तुकाराम महाडिक, संस्थेतील वाहतूक पर्यवेक्षक दौलत दत्तात्रय ढोक, विजय संपत कुंभार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत संतोष माळवदकर यांची पत्नी सुनीता (वय ४०) यांनी कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संतोष माळवदकर सिंहगड सिटी स्कूलमधील विद्यार्थ्यांची वाहतूक करतात.

१८ ऑक्टोबर रोजी ते सिंहगड सिटी स्कूलच्या आवारात लावलेली बस पाणी मारून स्वच्छ करत होते, त्या वेळी बसमधील कॉम्प्रेसरमधील वायरमधून विजेचा धक्का माळवदकर यांना बसला. विजेचा धक्का बसल्याने माळवदकर बेशुद्ध पडले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. कोंढवा पोलिसांनी सुरुवातीला आकस्मात मृत्यू, अशी नोंद केली होती. माळवदकर यांच्या पत्नी सुनीता यांनी नुकतीच पोलिसांकडे फिर्याद दिली. सदोष वायरमधून विजेचा धक्का बसून पतीचा मृत्यू झाला. बसची देखभाल न केल्याने दुर्घटना घडली. दुर्घटनेस संस्थेतील संचालक तसेच पर्यवेक्षक जबाबदार असल्याचे त्यांनी फिर्यादीत नमूद केले.

## नारायणगाव येथे गोदरेज कामपीनेचे बनावट कृषी औषध विक्री करणाऱ्या दुकानावर छापा टाकून बनावट औषध केले जप्त

जुन्नर । प्रतिनिधी

नारायणगाव पोलीस व दक्षयानी सर्व्हिस या कामपीने नारायणगाव येथील हर्षाली कृषी उद्योग या दुकानात छापा टाकून गोदरेज कामपीनेचे बनावट कृषी औषध जप्त केले आहे.

याबाबत हकीकत अशी कि दक्षयानी सर्व्हिस या कामपीनेचे कर्मचारी मधुकर मुरलीधर आमराव यांना माहिती मिळाली होती कि नारायणगाव येथील हर्षाली कृषी उद्योग या दुकानात गोदरेज कामपीनेचे सुपर शक्ती कम्बाईन या औषधाचे हुबहू नकल करून बनावट औषध करून विक्री केली जात आहे. मधुकर आमराव हे मागील १० वर्षांपासून दक्षयानी सर्व्हिस या कंपनीमध्ये काम करत असून गोदरेज या कंपनीचे उत्पादन




ट्रेडमार्क व कॉपरेटचे उल्लंघन व बनावट उत्पादन करून असून मालाची कोणी विक्री करत असल्यास त्याचा शोध घेऊन त्याच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे हाक गोदरेज कंपनीने दक्षयानी सर्व्हिस यांना दिला आहे त्या अनुषंगाने मधुकर आमराव यांनी मिळालेल्या माहितीनुसार नारायणगाव पोलीस ठाण्यात तक्रार देऊन, पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी एक पथक तयार करून हर्षाली कृषी उद्योग या दुकानात छापा मारला असता त्याठिकाणी त्यांना सुपर शक्ती कॉम्बाईन या नावाचे ५०० मि.ली. चे प्रत्येकी २००० रु किमतीचे तीन बॉटल आढळून आले. पोलिसांनी कंपनीचे प्रतिनिधी यांच्याकडे असलेले कंपनीचे ओरिजनल बॉटल व हर्षाली कृषी उद्योग या दुकानात मिळालेल्या बॉटलची बारकाईने पाहणी केली असता बॉटल वरील छपाई, कंपनीचे लोगो, किंमत व दर्जा यामध्ये विसंगती असल्याचे यांना कळाले. त्याचप्रमाणे सदर दुकानदाराकडे गोदरेज कंपनीचे औषध विक्री करण्याचा परवाना देखील नव्हता. पोलिसांनी मिळालेला बनावट माल ताब्यात घेत दुकान मालक तानाजी आरोटे वय ४३ रा. नारायणगाव, याच्या विरोधात कॉपरेट उल्लंघन कायदा कलम ५१ व ६३ प्रमाणे गुन्हा नोंदकात कारवाई केली असून नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरिक्षक पाटील हे पुढील तपस करीत आहेत.

### जुन्या भांडणावरून एकाला कोयत्याने मारहाण

मंचर । प्रतिनिधी

जुन्या भांडणाचा राग मनात धरून आतिष अमित बिडकर (वय १९, रा. मंचर, ता. आंबेगाव) याला कोयत्याने व हातातील काठ्यांनी मारहाण केली. ही घटना मंचर येथे घडली. याप्रकरणी पाच जणांच्या विरोधात मंचर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अवधूत टेमकर, कुणाल टेमकर, सार्थक भोर, भूषण टेमकर (सर्व रा. अवसरी खुर्द, ता. आंबेगाव), सिद्धेश वैभव कडुसकर (रा. साकोरे, ता. आंबेगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंचर बसस्थानक परिसरात सुरुवातीला सूरज बिडकर याच्याबरोबर झालेल्या जुन्या भांडणाच्या कारणावरून 'तुम्ही सूरज बिडकरचे भाऊ आहेत काय?' असे विचारून शिवीगाळ दमदाटी करून मारहाण केली. आतिष बिडकर याचा भाऊ सागर संतोष बिडकर यालाही मारहाण करण्यात आली. पुढील तपास मंचर पोलिस ठाण्याचे पोलिस नाईक सुमीत मोरे करत आहेत.

# दस्तनोंदणीतून ३३ हजार कोटींचा महसूल

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे यंदाच्या आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर दरम्यान १६ लाख ६६ हजार दस्तनोंदणीतून ३३ हजार कोटींचा महसुल जमा झाला आहे. यंदा राज्य शासनाने नोंदणी विभागाला ५५ हजार कोटींचा महसूल जमा करण्याचे उद्दिष्ट दिले असून, या उद्दिष्टाच्या ६० टक्के इतका महसूल जमा झाला आहे.

राज्याला महसूल मिळवून देण्यात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचा दुसरा क्रमांक लागतो. जमीन, सदनिका, दुकाने आदींची खरेदी-विक्री, दोन व्यक्ती वा संस्थांमध्ये होणारे करार, बक्षीसपत्र, भाडेकरार, अशा विविध दस्तांच्या नोंदणीवेळी मुद्रांक शुल्क जमा होते. मुद्रांक शुल्कातून नोंदणी विभागाला हा महसूल मिळाला आहे.

राज्यामध्ये शहरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. शहरांच्या हद्दीलगतच्या गावांमध्येही मोठ्या प्रमाणावर फ्लॅट खरेदी- विक्रीचे व्यवहार होत आहेत, तसेच पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर आणि नाशिक या शहरांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे. यामुळे दस्त नोंदणीतून सरकारला महसूल मिळतो.

शासनाकडून विविध मोठे प्रकल्प हाती घेतले आहेत. रस्ते, सिंचन प्रकल्प, विमानतळ, मेट्रो प्रकल्प आदींबरोबर विविध विकासकामे सुरू करण्यात आली आहे. या कामांसाठी शासनालाही मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते. शासनाकडे जमा होणारा हा महसूल विविध विकासकामांवर खर्च केला जातो. जमा होणाऱ्या महसुलाच्या आकडेवारीवरूनच कोणत्या कामांसाठी किती निधी उपलब्ध करून द्यायचा, याचा निर्णय होत असतो. त्यामुळे नोंदणी विभागाकडे जमा होणाऱ्या महसुलाकडे शासनाचे लक्ष असते.

महसुलात होत आहे वाढ



यंदा राज्य शासनाने रेडी रेकनर अर्थात वार्षिक बाजारमूल्य दरात वाढ न करता रेडी रेकनरचे दर स्थिर ठेवले. त्याचाही परिणाम म्हणून दस्तनोंदणीच्या संख्येबरोबर महसुलातही वाढ झाली. पर्यायाने शासनाच्या तिजोरीतही वाढ झाली आहे. याचसह राज्यामध्ये शहरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. शहरांत मोठ्या प्रमाणावर दुकाने, सदनिकांचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होत आहेत. शिवाय शहरालगतच्या गावांमध्ये जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार होत आहे. यामुळे महसुलातही वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

जमा महसूल

महिना - दस्त संख्या - महसूल एप्रिल - २,२४,३१८ - ३ हजार ७६७ कोटी मे - २,५२,३३१ - ४ हजार ३३५ कोटी जून - २,०५,९०७ - ४ हजार ४०० कोटी जुलै - २,४४,२११ - ४ हजार ७०० कोटी ऑगस्ट -२,३५,४६७ - ५ हजार ३१ कोटी सप्टेंबर- १,८५,४२९ - ३ हजार ९९८ कोटी ऑक्टोंबर - २,३३,००८ - ५ हजार ८६ कोटी नोव्हेंबर - ८५, ७९१ - १ हजार ७५८ कोटी (दि. २० नोव्हेंबरपर्यंत)

## खराडी येथील फार्मसी महाविद्यालयांमध्ये ७५ वा संविधान दिन उत्साहात साजरा

पुणे । प्रतिनिधी

खराडी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उ र सळ कॉलेज ऑफ फार्मासिटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर या महाविद्यालय मध्ये दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वा संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदरच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील प्राध्यापक नितीन नेहरकर यांनी केले.

तसेच सर्व उपस्थित विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह संविधान प्रास्ताविक याचे सामूहिक वाचन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयातील द्वितीय वर्ष पदविका विभागाच्या सीमा चौधरी आणि अथर्व पाटील या विद्यार्थ्यांनी संविधान निर्मितीचा इतिहास व भारतीय संविधानाचे महत्त्व याबद्दल मनोगत व्यक्त केले.



सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉक्टर अशोक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तसेच डॉक्टर अशोक भोसले यांनी सर्व विद्यार्थ्यांना ७५ व्या संविधान दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा ही दिल्या.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पदविका महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉक्टर सुजित काकडे यांनी आपल्या देशाचे संविधान हे जगातील सर्वोत्कृष्ट संविधान असून या संविधानाद्वारे सर्व भारतीयांना मिळालेले मूलभूत हक्क आणि त्यांचे कर्तव्य यांची थोडक्यात माहिती दिली.

सदरच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदविका विभागाच्या प्राध्यापिका शुभांगी कारखिले यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पदवी विभागातील प्राध्यापक नितीन नेहरकर यांनी केले . सदरचे कार्यक्रमाचे उत्कृष्ट रित्या आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्राध्यापिका भाग्यश्री शेलार यांनी केले.